सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ५४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १८ मार्च २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## १८ हजार फूट उंचीवर पॅराशूट उघडतील, समुद्रात लँडिंग, असा असेल सुनीता विल्यम्स यांचा परतीचा प्रवास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८ वाशिंग्टन**

मागच्या नऊ महिन्यांपासून आंतरराष्ट्रीय अंतराळ केंद्रात अडकलेल्या भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांच्या पृथ्वीवरील घरवापसीला आता काही तासच उरले आहेत. आंतरराष्ट्रीय अंतराळ केद्रामधून स्पेसक्राफ्ट अनडॉक झालं असून, ते भारतीय वेळेनुसार बुधवारी पहाटे ३.३० वाजता समुद्रात उतरण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर सुनीता विल्यम्स आणि त्यांना घेऊन येणाऱ्या ड्रॅगन स्पेसक्राफ्टच्या परतीच्या प्रवासाची प्रकिया कशी असेल, याची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे आहे.



अमेरिकेची अंतराळ संस्था असलेल्या नासाकडून सुनीता विल्यमस आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या परतीच्या प्रवासाबाबतची माहिती नियमितपणे दिली जात आहे. तसेच या प्रवासाबाबतचं वेळापत्रकही नासाकडून प्रसिद्ध करण्यात आलं आहे. हे वेळापत्रक अंदाजित असून, त्यामध्ये हवामानातील बदलानुसार बदलही होऊ शकतो. नासाच्या वेळापत्रकानुसार सुनीता विल्यम्स यांच्या परतीच्या प्रवासाची पूर्ण वेळ १७ तासांपर्यंत असण्याची शक्यता आहे.

सुनीता विल्यम्स आणि त्यांच्यासोबत असलेल्या अंतराळवीरांना घेऊन येत असलेल्या ड्रॅगन स्पेसक्राफ्टच्या परतीच्या प्रवास विविध टप्प्यांमध्ये होणार आहे. स्पेसक्राफ्टमध्ये प्रवेश करण्यापूर्वी अंतराळवीर प्रेशर सूट परिधान करतात. त्यानंतर हॅच बंद करून कुठलीही गळती होत नसल्याची पडताळणी केली जाते. त्यानंतर हे स्पेसक्राफ्ट आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकापासून वेगळं होतं. अनडॉकिंगची ही प्रक्रियासुद्धा विविध टप्प्यांमध्ये होते. तसेच अखेरच्या टप्प्यात हे स्पेसक्राफ आंतरराष्ट्रीय अंतराल केंद्रापासून पूर्णपणे वेगळं होऊन, पृथ्वीच्या दिशेने प्रवासाला सुरुवात करतं. सुनिता विल्यम्स यांना घेऊन येत असलेल्या स्पेसएक्सच्या ड्रॅगन स्पेसक्राफ्टची आज सकाळी १०.३० च्या सुमारास अनडॉकिंग झाली आहे.त्यानंतर स्पेसक्राफ्ट डीऑर्बिट बर्न सुरू करतं. ही प्रक्रिया बुधवारी पहाटे २ वाजून ४१ मिनिटांनी होण्याची शक्यता आहे. त्यानुसार इंजिन सुरू केलं जाईल, त्यामुळे स्पेसक्राफ्ट हे पृथ्वीच्या आणखी जवळ येईल. स्पेस एक्सचं ड्रॅगन हे स्पेसक्राफ्ट तब्बल २७ हजार किमी प्रति तास वेगाने पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करेल. त्यानंतर जमिनीपासून सुमारे १८ हजार फूट उंचीवर सर्वप्रथम दोन ड्रॅगन पॅराशून उघडतील. तर ६ हजार फुटांवर मुख्य पॅराशूट उघडेल.

अखेरच्या टप्प्यात स्पॅशडाऊन अर्थात अंतराळवीरांचं लँडिंग फ्लोरिडामधील समुद्र किनाऱ्याजवळच्या समुद्रात होईल. या भागातील हवामान खराब असल्यास अन्य ठिकाणीही ही लँडिंग होऊ शकते. लँडिंगची सध्याची नियोजित वेळ ही बुधवारी पहाटे ३ वाजून २७ मिनिटांची आहे.

## उद्धव ठाकरेंनी मोदींची माफी मागितली, पुन्हा येतो म्हणाले

### एकनाथ शिंदेंची भर सभागृहात गौप्यस्फोटांची मालिका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई**

महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूरमध्ये सोमवारी रात्री हिंसाचार उफळला होता. दोन गटांतील धार्मिक तेढ निर्माण झाल्यामुळे मोठी जाळपोळ आणि दगडफेकीची घटना नागपुरात घडली. या घटनेसंदर्भात मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी आज सभाहात निवदेन दिले. यावेळी, सत्ताधाऱ्यांना या घटनेवरुन धारेवर धरणाऱ्या शिवसेना उबाठा पक्षाच्या आमदारांना एकनाथ शिंदेंनी आक्रमक शैलीत सुनावलं. तर, महाविकास आघाडीच्या काळातील घटनांचा उल्लेख करत उद्धव ठाकरेंवरही हल्लाबोल केल्याचं पाहायला मिळालं. खुर्चीसाठी यांनी बाळासाहेब ठाकरेंचे विचार सोडले. तुम्ही काँग्रेस सोबत जाऊन खुर्ची मिळवलीस, पण विचारधारा सोडली. ह्यांचे प्रमुख हे गेले होते लोटांगण घालून आले. मला वाचवा मला वाचवा म्हणाले तिथ जाऊन सांगून आले की आम्ही महायुती सरकारमध्ये सामील होऊ. मात्र, त्यांचा डाव मी पलटवून टाकला. नोटीस आल्यावर गेले होते लोटांगण घालायला, अशा शब्दात एकनाथ शिंदेंनी सभागृहात गौप्यस्फोटांची मालिकाच लावली.




महाविकास आघाडी सरकार असताना देवेंद्र फडणवीस, गिरीश महाजन यांना जेलमध्ये टाकण्याचा त्यांचा डाव होता. औरंग्याचे विचार यांनी घेतले, मात्र मी बाळासाहेबांना सोडलं नाही. त्यामुळे, माझ्यासोबत ६० लोक आले, हिंदुत्वाचं सरकार मी आणलं. तुम्हाला फक्त २० लोक निवडून आणता आले, असे म्हणत जनतेचा कौलही आमच्याच बाजुने असल्याचे एकनाथ शिंदेंनी म्हटले. एक अंदर की बात सांगतो ह्यांचे प्रमुख मोदींना भेटायला गेले आणि माफी मागू लागले मला वाचवा. अनिल परब तुम्ही देखील दिल्लीला गेला होतात आणि तिथ जाऊन माफी मागितली आणि राज्यात माघारी येऊन पलटी मारली, असा गौप्यस्फोटच एकनाथ शिंदेंनी भरसभागृहात केला.

## हर्षवर्धन सपकाळ, तुमचे डोळे काढले का? काय केले?

### फडणवीसांवरील टीकेचा शिंदेंनी घेतला समाचार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची थेट औरंगजेबाशी तुलना करणारे विधान केले. औरंगजेब क्रूर शासक होता, देवेंद्र फडणवीस तेवढेच क्रूर आहेत, असे विधान काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले होते. यानंतर आता राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडताना पाहायला मिळत आहेत. हर्षवर्धन सपकाळ यांनी केलेल्या विधानावरून महायुतीतील नेते काँग्रेसवर सडकून टीका करत आहेत. यातच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर जोरदार टीका केली.



विधान भवनात पत्रकारांशी बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, अबू आझमींनी याची सुरुवात केली. अबू आझमीला काही विशिष्ट समाजाच्या मतांची जुळवणी करायची असते. परंतु, विशिष्ट मते घेत असताना समाजांमध्ये द्वेष निर्माण होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. म्हणूनच अबू आझमीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. औरंगजेबाचे समर्थन, उदात्तीकरण करण्यासाठी पुढे येतील, त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. औरंगजेबाने राज्यात अनेक अत्याचार केले. औरंगजेब हा महाराष्ट्राला लागलेला कलंक आहे, असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी औरंगजेबाची तुलना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी केली. म्हणाले की, हे क्रूर प्रशासक आहेत. म्हणजे देवेंद्र फडणवीस यांनी हर्षवर्धन सपकाळ यांचे डोळे काढले का, त्यांची जीभ छाटली का, त्यांची नख काढली का, त्यांची सालपट सोलली का, काय केले? औरंगजेबाने अनन्वित अत्याचार केले होते. तुम्ही त्यांची बरोबरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची करता. आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून राज्य चालवत आहोत. सर्वसामान्य लोकांना न्याय देण्याचे काम करत आहोत, या शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हर्षवर्धन सपकाळ यांनी केलेल्या टीकेचा समाचार घेतला.

## नागपूरमधील कालची घटना महाविकास आघाडीने घडवून आणली; संजय शिरसाटांचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई**

औरंगजेबाच्या कबरीला हटविण्यावरुन नागपुरातील महाल परिसरात सायंकाळी तरुणांच्या दोन गटांत भीषण राडा झाला. यातून वातावरण तापले व मोठा जमाव रस्त्यांवर उतरला. यात काही असामाजिक तत्त्वांनी जाळपोळ केली व पोलिसांच्या दिशेने दगडफेक करत धक्काबुक्की केली. जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांना लाठीमार करावा लागला. दगडफेकीत १५ पोलिस जखमी झाले आहेत. दरम्यान, आता या प्रकरणावरुन राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. मंत्री संजय शिरसाट यांनी महाविकास आघाडीवर आरोप केले आहे.



नागपुरातील कालची घटना महाविकास आघाडीने घडवून आणली असा मोठा आरोप मंत्री संजय शिरसाट यांनी केला आहे. औरंगजेबाच्या कबरीशी मुस्लिमांना काही देण-घेण नाही, असंही मंत्री शिरसाट म्हणाले.

ज्या ठिकाणी कबर आहे त्या ठिकाणी मस्लिम लोक जात नाहीत. मुस्लिमांना कबरीशी काही देण-घेण नाही. कालची घटना ही महाविकास आघाडीने घडवून आणली आहे. शिवाजी महाराज यांचा इतिहास जर औरंगजेबामुळे लिहायचा असं जर यांचं संशोधन असेल तर महाराजांच्या बाजूला औरंगजेबाचा पुतळा उभा करायाचा आहे का?, असा सवालही शिरसाट यांनी केला.

संजय शिरसाट म्हणाले, ही लोक अशी मुर्खपणाची वक्तव्य करत आहेत. त्यांना आम्ही मानत नाही. विरोधकांना कालची घटना अंगलट आली आहे हे कळालं आहे. आम्हाला महाराष्ट्रात कुठेही दंगल नको आहे. नितेश राणे यांच्या बोलण्याने कुठेही काहीही होत नाही, असंही संजय शिरसाट म्हणाले.

**पोलिस उपायुक्तांवर हल्ला**

नागपूरचे पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल हे रस्त्यावर उतरले होते. जमावाकडून दगडफेक करण्यात आल्यानंतर पोलिस आयुक्त जखमी झाले. पोलिस उपायुक्त निकेतन कदम यांच्यावर जमावातील काहींनी धारदार शस्त्रांनी हल्ला केला. त्यात त्यांच्या दोन्ही हातांना गंभीर जखम झाली. त्यांना प्रथम मेयो रुग्णालयात आणि नंतर खासगी रुग्णालयात हलविण्यात आले.

## मोफत शिक्षण तरी ३ वर्षांत विद्यार्थिनी तेवढ्याच

### राज्य शासनाच्या आर्थिक सर्वेक्षणातून माहिती उघड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई**

राज्यातील अकरावी आणि बारावीमध्ये शिकणाऱ्या मुलींसाठी शासनाकडून प्रोत्साहनपर योजनेंतर्गत मोफत शिक्षण दिले जाते. या योजनेत मागील तीन वर्षांपैकी प्रत्येक वर्षी १२ लाख ९९ हजार इतक्याच लाभार्थी मुलींची संख्या असून, त्यात एकाही मुलीची वाढ झालेली नाही. राज्य शासनाने नुकत्याच सादर केलेल्या आर्थिक सर्वेक्षण अहवालातून ही माहिती उघड झाली आहे.

उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या मुलींची पटसंख्या वाढावी यासाठी शासनाच्या वतीने अहिल्याबाई होळकर योजनेमार्फत मोफत प्रवास योजना, तसेच कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय अशा योजना राबवीत आहे. त्याचप्रमाणे शासनाच्या प्रोत्साहनपर योजनेमधून मुलींना मोफत शिक्षणाची लाभदेखील देण्यात येतो.

मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या योजनेत २०२२-२३ यावर्षी १२ लाख ९९ हजार, २०२३-२४ या वर्षीदेखील १२ लाख ९९ हजार, तसेच २०२४-२५ यावर्षीसुद्धा १२ लाख ९९ हजारच लाभार्थी मुलींची संख्या असल्याचे या आर्थिक सर्वेक्षणातून समोर आले आहे. सलग तीन वर्षांत एकाही मुलीची त्यात वाढ नाही, याबाबत शिक्षणतज्ज्ञांकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

## राज्यातील १२४७३ ग्रामपंचायतींमध्ये राहणार महिलाराज, आरक्षण झाले निश्चित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई**

लोकसंख्येच्या प्रमाणात व समर्पित आयोगाच्या निकषानुसार राज्यातील ग्रामपंचायतींच्या २४८८२ थेट सरपंच पदांचे आरक्षण निश्चित करण्यात आलेले आहे. यामध्ये १२,४७३ पदे महिला सरपंचांसाठी राखीव असल्याने या ग्रामपंचायतींमध्ये महिलाराज राहील. सन २०३० पर्यंत हे आरक्षण कायम राहणार आहे.



या अनुषंगाने ग्रामविकास विभागाची अधिसूचना प्रसिद्ध झालेली आहे. यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व सर्वसाधारण प्रवर्ग यामध्ये ५० टक्के थेट सरपंचपदे महिलांसाठी राखीव आहेत. यामध्ये अनुसूचित क्षेत्रात पूर्णतः येणाऱ्या ग्रामपंचायती वगळण्यात आलेल्या आहेत.

समर्पित आयोगाच्या निकषानुसार ५० टक्क्यांवर आरक्षण जात असल्यास ती पदे सर्वसाधारण प्रवर्गात अधिसूचित होतात. शिवाय नागरिकांचा मागास प्रवर्गाची पदे २७ टक्के आरक्षणाच्या मर्यादेत असल्याचे निवडणूक विभागाने सांगितले. अधिसूचनेनुसार आरक्षित सरपंचपदाची संख्या निश्चित झालेली असली तरी तालुक्यांमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात व निकषानुसार कोणत्या ग्रामपंचायतीमध्ये कोणत्या प्रवर्गातील आरक्षण निश्चित होणार आहे, यासाठी मात्र इच्छुकांना प्रतीक्षाच करावी लागणार आहे.

**थेट सरपंचपदाचे प्रवर्गनिहाय आरक्षण (मार्च २०३० पर्यंत)**

अनुसूचित जाती : ३२५८ पदे (यापैकी १६३६ पदे महिलांकरिता)

अनुसूचित जमाती : १८४३ पदे (यापैकी ९३३ पदे महिलांसाठी)

नागरिकांचा मागास प्रवर्ग : ६१९५ पदे (३१०५ पदे महिलांसाठी)

सर्वसाधारण प्रवर्ग : १३५८६ पदे (यापैकी ६७९९ पदे महिलांकरिता)

एकूण : २४८८२ थेट सरपंचपदे (यापैकी १२४७३ पदे महिलांकरिता

## नागपूरमधील प्रकार सुनियोजित पॅटर्न, पोलिसांवर हल्ले सहन करणार नाहीत; मुख्यमंत्री फडणवीसांचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई**

सकाळची एक घटना घडल्यानंतर पूर्णपणे शांतता होती. त्यानंतर संध्याकाळी काही लोकांनी जाणीवपूर्वक असा हल्ला केल्याचे समोर येत आहे. कारण जवळपास एक ट्रॉलीभरून दगड सापडले आहेत. काही लोकांनी घरांवर जमा करून ठेवलेले दगड पाहायला मिळाले. शस्त्रे मोठ्या प्रमाणावर जप्त करण्यात आली. वाहनांची जाळपोळ झाली. ठरवून काही ठराविक घरांना, आस्थापनांना लक्ष्य करण्यात आले. त्यामुळे यात काही लोकांचा सुनियोजित पॅटर्न दिसत आहे, असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये झालेल्या हिंसाचाराच्या घटनेबाबत विधानसभेत निवेदन देताना सांगितले.

औरंगजेबाच्या कबरीला हटविण्यावरून नागपुरातील महाल परिसरात सायंकाळी तरुणांच्या दोन गटांत भीषण राडा झाला. यातून वातावरण तापले व मोठा जमाव रस्त्यांवर उतरला. यात काही असामाजिक तत्त्वांनी जाळपोळ केली व पोलिसांच्या दिशेने दगडफेक करत धक्काबुक्की केली. जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांना लाठीमार करावा लागला. दगडफेकीत १५ पोलिस जखमी झाल्याचे वृत्त असून रात्री उशिरापर्यंत धरपकड मोहीम राबवत पोलिसांनी अनेक तरुणांना ताब्यात घेतले. यावरून राजकीय वर्तुळात प्रतिक्रिया उमटत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत निवेदन केले. नेमके काय झाले, याची सविस्तर माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाला दिली.

एकूण तीन गुन्हे गणेशपेठ पोलिसांत दाखल झाले आहेत.




तहसील पोलीस स्टेशनला दोन गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. असे एकूण पाच गुन्हे आहेत. ११ पोलीस स्टेशनच्या हद्दीत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. एंट्री पॉइंटवर नाकाबंदी करण्यात आली आहे. त्यात तहसील, कोतवाली, गणेशपेठ, पाचपावली, लकडगंज, शांतीनगर, सक्करदरा, नंदनवन, इमामवाडा, यशोदरानगर, कपिलनगर या पोलीस ठाण्यांचा समावेश आहे. एसआरपीएफच्या पाच तुकड्या इथे तैनात करण्यात आल्या आहेत. या घटनेत एक क्रेन, दोन जेसीबी व काही चारचाकी वाहने जाळण्यात आली. या संपूर्ण घटनेत ३३ पोलीस जखमी झाले आहेत. त्यात तीन उपायुक्त दर्जाचे पोलीस आहेत. त्यातल्या एका उपायुक्तावर कुऱ्हाडीने हल्ला करण्यात आला आहे. एकूण ५ नागरिक जखमी झाले आहेत. तिघांवर उपचार करुन घरी सोडण्यात आले आहे. दोन रुग्णालयात आहेत. त्यापैकी एक आयसीयूत आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

**पोलिसांवर हल्ला करणारे जे कुणी असतील, त्यांना सोडणार नाही**

कोणत्याही परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था हाती घेण्याची कुणालाही परवानगी दिली जाणार नाही. एक नक्की सांगतो की, पोलिसांवर ज्यांनी कुणी हल्ला केला असेल, त्यांना काहीही झाले तरी सोडले जाणार नाही. पोलिसांवर झालेला हल्ला सहन केला जाणार नाही. पोलीस शांतता प्रस्थापित करत होते. अशा वेळी पोलिसांवर केलेला हल्ला करणे चुकीचे आहे. महाराष्ट्रात कायदा-सुव्यवस्था राखणे ही आपली सगळ्यांची जबाबदारी आहे. सर्व जनतेला विनंती करू इच्छितो की, सर्व समाजांचे धार्मिक सण या काळात चालले आहेत. अशा परिस्थितीत सगळ्यांनी संयम ठेवायला हवा. अशा वेळी आपल्याला कायदा व सुव्यवस्था कशी राखता येईल, यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी केले.

## संपादकीय ......

# विरोधाची धार बोथट

तीन चतुर्थांश बहुमताने सत्तारूढ झालेल्या महायुती सरकारातील भाजपसह तीन पक्ष जोमाने कामाला लागलेले असताना काँग्रेस, शिवसेना (उबाठा) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या महाविकास आघाडीचे त्रिपक्ष मात्र गलितगात्र आणि निष्प्रभ ठरत असल्याचे दिसत आहे. चार महिन्यांपूर्वी विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवाच्या छायेतून हे तिन्ही पक्ष बाहेर आलेले नाहीत. लोकशाही राज्य व्यवस्थेत सत्तारूढ पक्षाप्रमाणे विरोधकही प्रबळ असावा लागतो. विद्यमान 'मविआ' ही अपेक्षा पूर्ण करताना दिसत नाही. विरोधकांची धार कमी नव्हे, तर बोथटच झाल्याचे चित्र दिसत आहे.

विद्यमान महायुती सरकारचे विधानसभेत प्रचंड बहुमत आहे आणि विरोधकांचे संख्याबळ मोजके आहे. म्हणून एखाद्या प्रश्नावर विरोधकांचा आवाज म्हणावा तेवढा बुलंद होत नाही, असे समर्थन कोणी करू शकेल; मात्र हे समर्थन लंगडे आहे. आताच्या त्रिपक्ष महायुती सरकारपेक्षाही १९६०-७० च्या दशकात महाराष्ट्र विधानसभेत काँग्रेसचे बहुमत प्रचंड होते आणि विरोधक मूठभरच होते. १९६२ च्या विधानसभेत काँग्रेसचे संख्याबळ २६४ सदस्य संख्येपैकी तब्बल २१५ होते. १९६७ मध्ये २७० सदस्य संख्येपैकी काँग्रेस आमदार होते २०३ आणि १९७२ मध्ये हेच संख्याबळ २२१ होते. विरोधक पन्नास-साठच्या घरात असताना विरोधी नेते काँग्रेस सरकारवर घणाघाती हल्ला करीत आणि प्रसंगी निर्णय बदलायला भाग पाडीत. तेव्हा विरोधी पक्षांच्या शब्दांना कमालीची धार होती. १९५६ ते १९६० या काळात मुंबई राज्य असताना समाजवादी पक्षाचे नेते एस. एम. जोशी हे विरोधी पक्षनेते होते. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर एस. एम. जोशी, आचार्य प्र. के. अत्रे आदी सरकारवर तुफान हल्ला चढवीत आणि त्यांच्या सरबत्तीला उत्तर देताना सरकार पक्षाच्या नेत्यांची गाळण उडत असे. यशवंतराव चव्हाण हे तेव्हा मुख्यमंत्री होते. ते पट्टीचे वक्ते. हजरजबाबी. त्यांची भाषा सुसंस्कृत आणि शब्दावर हुकुमी पकड. तथापि, विरोधी मार्याला तोंड देताना काही वेळा त्यांचीही तारांबळ उडत असे. एकदा त्यांनी अत्र्यांना विचारले, 'अहो, संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, यामध्ये 'च' कशाला हवा?' अत्र्यांनी तत्काळ उत्तर दिले, 'चव्हाणसाहेब, तुमच्या आडनावातला 'च' काढला तर काय राहील?' मुख्यमंत्री चव्हाण यांना त्यावर काही बोलता आले नाही.

गेल्या तीन-चार महिन्यांत कायदा सुव्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित व्हावा, अशा अनेक घटना घडल्या. बीड जिल्ह्यातील मस्साजोग सरपंचांची हत्या, परळीच्या महादेव मुंडेंचा खून, स्वारगेट स्टँडवर बसमध्ये तरुणीवर झालेला दुहेरी अत्याचार, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या मुलीची टोळक्याने केलेली छेडछाड ही प्रकरणे सार्वजनिक सुरक्षेविषयी चिंता निर्माण करणारी आहेत. या सार्या प्रकरणात विरोधी पक्षांनी आक्रमक भूमिका घेणे अपेक्षित होते. संघाचे माजी कार्यवाह भय्याजी जोशी यांचे मुंबईबाबतचे वक्तव्य, प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर यांची युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी अवमानकारक वक्तव्ये याविषयी विरोधक रस्त्यावर उतरल्याचे दिसले नाही.

# आमदार खोडकेच्या जनसंपर्क कार्यालयात जल्लोष, आतषबाजी






**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती** विधान परिषदेच्या पाच जागांसाठी नामांकन दाखल करण्यात आले असून त्यामध्ये राष्ट्रवादीचे नेते संजय खोडके यांचा समावेश आहे. खोडके यांना राष्ट्रवादीकडून उमेदवारी मिळाल्यामुळे स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. फटाक्यांची आतिषबाजी आणि ढोल ताशाच्या गजरात एक दुसऱ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दुपट्टे घालून कार्यकर्त्यांनी मनमोहक नृत्याचा फेर धरून हर्ष व्यक्त केल्याचे दिसून आले. मोठ्या प्रमाणात यावेळी महिला भगिनी, युवक बांधव व ज्येष्ठ नागरिक प्रामुख्याने सहभागी होते.

**हा माझ्या पतीच्या साडे तीन दशकांच्या निष्ठेचा पुरस्कार : आमदार सुलभा खोडके-** यजमान संजय खोडके यांना आमदार करणाऱ्या पक्षाच्या




निर्णयाबद्दल आमदार तथा राष्ट्रवादीच्या नेत्या सुलभा खोडके यांनी आनंद व्यक्त केला. संजय खोडके यांच्या गेल्या साडेतीन दशकांच्या निष्ठेचा हा पुरस्कार असल्याचे त्यांनी सांगितले. सुलभाखोडके म्हणाल्या की, संजय खोडके आमदार होणे हे अमरावतीकरांच्या आशिर्वादाने शक्य झाले आहे. आपल्या यजमानाला आमदार म्हणून पाहण्याचे स्वप्न आपण जपत असून आज अजितदादांनी ते स्वप्न साकार करण्याची संधी दिली आहे. त्यांचा आनंद शब्दात व्यक्त करता येत नाही. अमरावतीतील तमाम जनतेचे विशेषतः खोडके समर्थक कार्यकर्त्यांचे त्यांनी अभिनंदन केले आहे.राष्ट्रवादी कोअर कमिटीच्या बैठकीत अजितदादांसह आघाडीचे सर्व नेते उपस्थित होते, असे त्यांनी सांगितले. त्यात ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल, दिलीप वळसे पाटील, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आदींचा समावेश होता. संजय खोडके यांच्या नावाला सर्वांनी पाठिंबा दिला.

सुलभा खोडके म्हणाल्या की, संजय खोडके हे गेल्या ३५ वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या फ्लोअर मॅनेजमेंटमध्ये कार्यरत आहेत. संजय खोडके यांनी राज्यातील प्रत्येक क्षेत्रात विकासकामांना मंजुरी व अंमलबजावणी करण्यात मोलाचे योगदान दिले आहे. एकनिष्ठ राहून त्यांनी राष्ट्रवादीसाठी काम केले आहे. अशा स्थितीत विधान परिषदेची एक जागा आणि ८८ नावे होती. मात्र कोअर कमिटीच्या बैठकीत उपस्थित सर्व ज्येष्ठ नेत्यांनी या पदासाठी संजय खोडके यांचे नाव एकमताने घेतले.

सुलभा खोडके किंचित भावूक झाल्या आणि म्हणाल्या की, त्यांचे यजमान संजय खोडके यांच्या निष्ठेचा हा सर्वात मोठा पुरावा आणि बक्षीस आहे. आज पक्षाने त्यांच्यावर विश्वास व्यक्त केला. संजय खोडके हे नक्कीच उत्कृष्ट आमदार म्हणून सिद्ध होतील. ते आपली संपूर्ण ताकद आपल्या भागातील लोकांसाठी वापरणार आहेत. पक्षातील सर्व बड्या नेत्यांबद्दलही त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.-

# भाजीपाला पिकांसाठी सामान्य सल्ला वाचा सविस्तर

**दि. १८ विदर्भ प्रजासत्ताक**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ज्ञ समितीने पुढील प्रमाणे कृषी हवामान आधारीत कृषी सल्ल्याची शिफारश केली आहे.

प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार मराठवाड्यात पुढील पाच दिवस आकाश स्वच्छ राहून हवामान कोरडे शक्यता आहे. मराठवाड्यात पुढील २ ते ३ दिवसात कमाल तापमानात हळूहळू १ ते २ अंश सेल्सिअसने वाढ होऊन त्यानंतर १ ते २ अंश सेल्सिअसने घट होण्याची शक्यता आहे. मराठवाड्याच्या उत्तर भागात पुढील २ ते ३ दिवसात किमान तापमानात हळूहळू २ ते ३ अंश सेल्सिअसने घट होण्याची शक्यता आहे.

**भाजीपाला** - काढणीस तयार असलेल्या भाजीपाला पिकांची काढणी करून घ्यावी. उन्हाळी हंगामासाठी लागवड केलेल्या भाजीपाला पिकात अंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे. कमाल तापमानात झालेली वाढ, वाढलेल्या बाष्पोत्सर्जनाच्या वेगामुळे, उन्हाळी भाजीपाला पिकात आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे.

सध्याच्या उष्ण वातावरणामुळे मिरची पिकावरील फुल किडींच्या व्यवस्थापनासाठी सिटामेप्रिड २०% एसपी २ ग्रॅम किंवा सायअँट्रानिलीप्रोल १०.२६ ओडी १२ मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५% एसजी ४ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**पीक व्यवस्थापन**

**ऊस** : ऊस पिकास आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. ऊस पिकात खुरपणी करून तण नियंत्रण करावे. ऊस पिकावर खोड किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस २०% २५ मिली किंवा क्लोरॅट्रानोलीप्रोल १८.५% ४ मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ऊस पिकावर पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे, याच्या व्यवस्थापनासाठी डायमिथोएट ३०% ३६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**हळद** : हळद पिकाची पाने पिवळी पडून जमिनीवर लोळतात तेव्हा हळदीची काढणी करावी. कंद काढणीपूर्वी संपूर्ण पाने जमिनीलगत कापून घ्यावी. काढणीस तयार असलेल्या हळद पिकाची काढणी करून घ्यावी.








**करडई** : वेळेवर पेरणी केलेल्या व काढणीस तयार असलेल्या करडई पिकाची काढणी करून घ्यावी.

**तीळ** : उन्हाळी तीळ पिकास मध्यम जमिनीत ८ ते १० दिवसांनी व भारी जमिनीत १२ ते १५ दिवसांच्या अंतराने सिंचन करावे. सिंचन हे शक्यतो तुषार सिंचन पध्दतीने करावे. उन्हाळी तीळ पिकास खताची दुसरी मात्रा दिली नसल्यास देण्यात यावी व त्यासोबत गंधक २० किलो प्रति हेक्टरी देण्यात यावे.

**फळबागेचे व्यवस्थापन**

काढणीस तयार असलेल्या मृग बहार संत्रा/मोसंबी फळांची काढणी करून घ्यावी. कमाल तापमानात झालेली वाढ, वाढलेल्या बाष्पोत्सर्जनाच्या वेगामुळे, संत्रा/मोसंबी, डाळींब व चिकू बागेस आवश्यकतेनुसार सकाळी किंवा संध्याकाळी पाणी द्यावे. जमिनीतील ओलावा टिकून राहण्यासाठी व जमिनीचे तापमान संतुलित राहण्यासाठी फळझाडाच्या आळ्यात आच्छादन करावे.




नविन लागवड केलेल्या संत्रा/मोसंबी, डाळींब व चिकू रोपांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी रोपांना सावली करावी. काढणी न केलेल्या व काढणीस तयार असलेल्या चिकू फळांची काढणी करावी.

**फुलशेती-** फुल पिकात खुरपणी करून फुल पिक तण विरहीत ठेवावेत व आवश्यकतेनुसार पाटाने पाणी द्यावे. काढणीस तयार असलेल्या फुलांची काढणी करून घ्यावी.


**तुती रेशीम उद्योग**

रेशिम किटकसंगेपन गृहात तापमापी वर २२ ते २५ अंश सेल्सिअस तापमान व ८०- ८५ टक्के आर्द्रता असेल तरच रेशीम किटक व्यवस्थीत तुती पाने खातात व वाढ व्यवस्थित होते. संगोपनगृहात हवा खेळती असावी व क्रॉस व्हेंटीलेशनची व्यवस्था करावी. (सौजन्य: मुख्य प्रकल्प समन्वयक, ग्रामीण कृषी मौसम सेवा,वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी)




# स्मार्टफोनच्या मदतीने तंदुरुस्ती

**दि. १८विदर्भ प्रजासत्ताक**



दिवसागणिक स्मार्टफोनवरील आपले अवलंबित्व वाढत आहे. एका अभ्यासानुसार भारतातील स्मार्टफोन वापरकर्त्यांची संख्या २०४० पर्यंत १.५५ अब्जांपर्यंत पोहोचेल. सामान्य संभाषणापासून ते संदेशवहनापर्यंत, संगीतापासून पुस्तकांपर्यंत, चित्रपटांपासून गेमिंगपर्यंत...

तुमच्या स्मार्टफोनच्या मदतीने तुम्ही दररोज किती पावले टाकता यावर सहज नजर ठेवू शकता. साधारणपणे, प्रत्येक स्मार्टफोनमध्ये एक सेन्सर असतो जो दररोज तुमच्या पावलांचे निरीक्षण करू शकतो. तज्ज्ञ आणि विविध संशोधने मानतात की निरोगी जीवन जगण्यासाठी आणि रोगांपासून दूर राहण्यासाठी आपण दररोज दहा हजार पावले चालली पाहिजेत. तुमच्या स्मार्टफोनवर दैनंदिन पावलांचा मागोवा घेणे सहज शक्य आहे. यातून तुम्हाला अधिक चालण्यास प्रवृत्त केले जाऊ शकते. यासाठी फोनमध्ये गुगल फिट सक्रिय करा. याशिवाय मॅप माय वॉक, फिटबिट, नायके रन क्लब यांसारख्या ॲप्सचा वापर करता येईल.

आहारसवयी : स्मार्टफोनमुळे आहार, पोषण आणि रोजच्या खाण्याच्या सवयी यांचा मागोवा ठेवणेही खूप सोपे झाले आहे. तुम्ही तुमच्या फोनद्वारे दिवसभर स्नॅक्स आणि जेवणाच्या स्वरूपात काय खाता याकडे लक्ष ठेवू शकता. स्मार्टफोनमुळे पोषक तत्त्वांचा मागोवा ठेवणे सोपे झाले आहे. यासाठी तुम्हाला पूर्वीप्रमाणे डायरी आणि पेन घेऊन बसण्याची गरज नाही. त्याऐवजी फोनवर एक पोषणासंबंधित ॲप डाऊनलोड करा आणि तुम्ही दिवसभरात खाल्लेल्या सर्व गोष्टींचा आढावा घ्या. याद्वारे तुमच्या खाण्याच्या सवयी आणि पोषणाबाबत जागरूकता वाढेल. तंदुरुस्त राहण्याचा आणि वजन कमी करण्याचा प्रयत्न करत असाल, तर मायफिटनेसपल, हेल्थफाई, लाईफसम इत्यादी पोषणाशी संबंधित ॲप्स यासाठी प्रभावी ठरतील.

कॅलरीजचे गणित

वजन वाढवणे किंवा कमी करणे किंवा ते एका मर्यादेत ठेवणे हे तुमचे ध्येय असल्यास या कामातही स्मार्टफोन मदतनीस ठरू शकेल. यासाठी कॅलरी मोजण्याचे ॲप डाऊनलोड करून, एका दिवसात किती कॅलरी वापरल्या आहेत याचा मागोवा सहज ठेवू शकता. हे ॲप्स एकाच वेळी किती अन्न किंवा कॅलरी वापरल्या पाहिजेत याबद्दल सूचना देखील देतात. कॅलरीजचा मागोवा घेण्याबरोबरच, हे ॲप्स ऊर्जा वापराविषयी माहिती देखील देतात. यामुळे आपल्याला फिटनेस उद्दिष्टे साध्य करणे सोपे होईल. स्मार्टफोनच्या मदतीने तुम्ही तुमच्या आरोग्यावरही लक्ष ठेवू शकता. त्याच्या मदतीने हृदयाचे ठोके, झोपण्याच्या पद्धती आणि तास आणि तणावाची पातळी यांचीही माहिती गोळा करता येते. तुमचे फिटनेस घड्याळ तुमच्या स्मार्टफोनशी कनेक्ट करून, तुम्ही तुमच्या शारीरिक आरोग्याविषयी तपशीलवार माहिती मिळवू शकता. इतकंच नाही तर स्मार्टफोनच्या मदतीने तुम्हाला आरोग्याशी संबंधित आगामी धोक्यांचीही वेळेवर सूचना मिळू शकते.

# बदली हवी तर मंत्रालयात जाऊ नका, वनाधिकाऱ्यांना सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती** : राज्यातील बदलीपात्र वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी (आरएफओ) मे महिन्यात होणाऱ्या बदल्यांच्या पार्श्वभूमीवर आतापासूनच मंत्रालयात 'फिल्डिंग' लावण्यास सुरुवात केली आहे. यावर वनमंत्री गणेश नाईक यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. यानंतर राज्याच्या वनबल प्रमुखांनी एका आदेशाद्वारे उपवनसंरक्षक ते आरएफओंना बदलीसाठी मंत्रालयात जाण्यास बंदी घातली आहे. राज्यात ९६३ आरएफओ आणि ३०० सहायक वनसंरक्षक कार्यरत आहेत. दरवर्षी १४०च्या आसपास अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय आणि विनंती बदल्या मंत्रालयातून होतात. तत्कालीन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आरएफओंच्या बदल्यांचे अधिकार वनबल प्रमुखांकडे दिले होते. आरएफओंच्या बदल्यांमध्ये राजकीय शिफारशी, ओळखी व आर्थिक व्यवहार यामुळे अनेकदा नियमबाह्य बदल्या होतात. या बदल्यांमुळे वनविभागाची प्रतिमा मलीन होत असल्याचे अनेकदा समोर आले आहे. त्यामुळे नियमात बसणाऱ्या आरएफओंना बदलीतून डावलले जाते. परिणामी, मे महिन्यात होणाऱ्या बदल्या लक्षात घेता ओळखीच्या मंत्र्यांच्या शिफारशींसाठी अनेक आरएफओंनी मंत्रालयात येरझाऱ्या सुरू केल्याची बाब वन प्रशासनाच्या निदर्शनास आली आहे.

वनविभागाच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक शोमिता बिश्वास यांच्या २८ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या पत्रानुसार वनविभागातील अधिकारी, कर्मचारी हे बदली अथवा पदस्थापनेकरिता थेट मंत्रालयात पत्रव्यवहार करीत असल्याप्रकरणी वनमंत्री गणेश नाईक यांनी नाराजी व्यक्त केली आहे. ही बाब वनबल प्रमुखांनी गांभीर्याने घेत बदलीपात्र वनाधिकाऱ्यांनी थेट मंत्रालयात पत्रव्यवहार न करता नियंत्रक अधिकाऱ्यांमार्फत पत्रव्यवहार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. केवळ अपवादात्मक परिस्थितीत वनमंत्र्यांना भेटण्याची मुभा देण्यात आलेली आहे. मे महिन्यात होणाऱ्या बदल्या लक्षात घेता वनपरिक्षेत्र अधिकारी, सहायक वनसंरक्षक हे सध्या मंत्रालयात लॉबिंग करीत आहेत. ओळखीतील मंत्री, आमदार, खासदारांच्या शिफारशींचा सिलसिलादेखील सुरू झाला आहे. बदलीकरिता पत्र घेतले जात आहे. बदलीसाठी राजकीय पत्र घेणे हे शिस्तीला धरून नसले तरी मध्यंतरी आरएफओंच्या बदलीकरिता राजकीय वशिलेबाजी झाल्याची बाब एका वृत्तपत्राने चव्हाट्यावर आणली, हे विशेष.

सध्या सामाजिक वनीकरण कोमात गेले आहे. त्यामुळे बदलीपात्र आरएफओ, एसीएफ हे प्रादेशिक वनपरिक्षेत्राला पसंती देत आहेत. अर्थकारणाच्या पाठबळावर काही अधिकारी 'प्रादेशिक'मध्ये सहजतेने पोस्टिंग मिळवितात. त्यामुळे अशा या कारभारावर वनमंत्री नाईक लगाम लावणार का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. १८ मार्च २०२५

शहर/ग्रामिण


# शेजाऱ्याला फसविण्याकरिता गुऱ्हाडा गावातील निर्दोष व्यक्तीची हत्या



## सुसाईड नोटमध्ये लिहिले शेजाऱ्यांचे नाव :अखेर आरोपी अटकेत

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१८वलगाव** – गुन्ह्यात फसविण्याकरिता गावातील एका व्यक्तीची खुनाच्या हत्या केली आणि शेजाऱ्यांच्या नावाची चिठ्ठी लिहून मृतकाच्या खिशात ठेवली. परंतु पोलिसांनी मुख्य आरोपीचा शोध घेऊन त्याला अटक केली. गणेश रमेशराव पांडे (वय ५५ रा. गुऱ्हाडा) असे मृतकाचे नाव आहे. तर महेश्वर शंकरराव सरोदे (वय ५० रा. गुन्हाडा) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

आरोपी महेश्वर सरोदे शिरखेड ठाण्यांतर्गत येणाऱ्या गुऱ्हाडा गांवात महेश्वर सरोदे परिवारासह राहतो. मागिल काही वर्षापासून सरोदेचे शेजारी राहणारे गणविर व अन्य लोकांसोबत पटत नसल्यामुळे त्यांच्यात सतत कुठल्या ना कुठल्या कारनावरून भांडण होत असे. तसेच दोन्ही कुटूंबातील सदस्य समोरासमोर येऊन मारहाण करीत होते. काही महिन्याआधी सरोदेने गणविरची दुचाकी सुध्दा जाळली होती. तसेच गणविरला खोट्या गुन्ह्यात फसविण्याचा सरोदे सतत प्रयत्नात होता.गावात राहणारा गणेश पांडे अमरावतीला एका हॉटेल मध्ये वेटरचे काम करतो. रात्रीला तो घरी येतो आणि सकाळीच निघून





जातो. त्यामुळे गावातील लोकांसोबत त्याचा जास्त संपर्क येत नाही. म्हणून सरोदेने गणेशची हत्या करुन गणविरला खोट्या गुन्ह्यात फसविण्याचा निर्णय घेतला. तसेचखून केल्यानंतर पोलिसांनी गणविरलाच अटक केली पाहिजे याबाबत सुध्दा त्याने प्लॅन रचला. ठरल्या प्रमाणे सरोदे रविवारी रात्री दुचाकीने अमरावतीला आला त्यावेळी त्याच्या दुचाकीला कुऱ्हाड बांधली होती. रात्री ११ नंतर गणेशचे काम आटोपल्यावर सरोदे त्याला भेटला आणि दोघे दुचाकीने शिराळा ते यावली मार्गाने गावाकडे निघाले. दरम्यान सरोदेने रस्त्या लगत दुचाकी थांबविली आणि रस्त्याच्या बाजूला दोघे दारु पिण्याकरिता बसले. तेव्हा सरोदेने गणेशला खुप दारू पाजली जास्त दारु झाल्यामुळे गणेश होशमध्ये नव्हता त्याचवेळी सरोदेने कुऱ्हाड काढली आणि गणेशच्या मानेवर सपासप वार करून त्याची हत्या केली. त्यानंतर शेजाऱ्यांच्या नावाने लिहिलेली चिठ्ठी मृत गणेशाच्या खिशात ठेवली आणि तेथून निघून गेला. सोमवारी सकाळी रस्त्याने जाणाऱ्या नागरिकांना गणेशचा मृतदेह दिसताच त्यांनी वलगाव पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि घटनास्थळाचा पंचनामा करुन मृतदेहाची पाहणी केली असता मृतकाच्या खिशात एक चिठ्ठी दिसताच पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करुन आरोपीचा शोध सुरु केला. तपास करीत असताना पोलिसांनी मृतकाच्या खिशात मिळालेल्या चिठ्ठीवर ज्या व्यक्तीचे नाव होते त्या व्यक्तीला चौकशीत घेतले आणि त्यांचीकसून चौकशी केली. परंतु संबंधित व्यक्ती रात्रीला घरीच होता हे स्पष्ट होताच पोलिसांनी तपासाची गती वाढविली. ज्या व्यक्तीची हत्या झाली तोच व्यक्ती आधी चिठ्ठी लिहिणार आणि मग स्वतःचा गळा कापून घेणार हे शक्य नाही. तसेच घटनास्थळावरसुध्दा कुठलेच हत्यार मिळाले नाही. लिहिलेली चिठ्ठी काही दिवसाआधी लिहिलेली वाटत होती आणि अक्षरे लहान मुलाचे वाटत होते. त्यामुळे पोलिसांनी गावातच चौकशी सुरु केली. तसेच गावातील कोणता व्यक्ती रात्रीला घरी आला याबाबत कसून चौकशी केली. तेव्हा महेश्वर सरोदेचे नाव पुढे येताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याची कसुन चौकशी केली असता त्याने पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. परंतु पोलिसांनी त्याला खाक्या दखविताच त्याने गुन्हा कबूल केला.

# पन्नालालनगर येथील नाल्यात पडला ट्रक, रस्ता खचल्यामुळे घडली घटना



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती–** पन्नालालनगर येथील पुलाजवळून जाणारा ट्रक अचानक रस्ता खचल्यामुळे नाल्यात पडल्याची घटना सोमवारी दुपारी उघडकीस आली. परंतु या घटनेत जीवितहाणी न झाल्यामुळे मोठा अनर्थ टळला.

सोमवारी दुपारी रविनगर ते पन्नालालनगर शॉटकट मार्गाने एक ट्रक माल घेऊन जात होता. पन्नालालनगर येथील नाला पार केल्यानंतर ट्रक नाल्यालगत बांधलेल्या रस्त्यावरून जात असताना खचल्यामुळे अचानक रस्ता ट्रक नाल्यात कोसळला. त्यामुळे ट्रक चालकासह दोन मजुर किरकोळ जखमी झाले. हे पाहताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली तसेच माजी नगरसेवक मिलींद बाबल सुध्दा घटनास्थळी पोहचले आणि मनपाच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली. तेव्हा अधिकारी घटनास्थळी पोहोचले. घटनेत जिवितहाणी न झाल्यामुळे मोठा अनर्थ टळला. परंतु घटनेचीगंभीरता पाहता माजी नगरसेवक बांबल यांनी सांगितले की मनपाने एक वर्षाआधीच रस्ता बांधला होता. परंतु रस्ता पाहिजे त्याप्रमाणे बांधला अधिकाऱ्यांना नाही. त्यामुळे त्याचवेळीच सांगितले होते. परंतु त्यांनी काहीच ऐकले नाही. त्यामुळे पन्नालालनगरला जाणारा हा शॉटकट रस्ता सुरळीत बांधला नाही तर मनपातील संबंधित अधिकाऱ्यांच्या कक्षाला कुलूप ठोकणार, असा इशारा मिलींद बांबल यांनी दिला.

# एपीएमसी ई निविदा सफाई कंत्राट प्रकरणातील अपील फेटाळले

## पणन संचालक पुणे यांचे आदेश धडकले जिल्हा उपनिबंधकांना कारवाईची मुभा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ अमरावती** कृषी उत्पन बाजार समिती प्रशासनाने गत वर्षी केलेल्या नियमबा गैरप्रकाराविरोधात शेतकरी संपर्थ समितीने तक्रार करीत कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी रेटून धरली होती. या प्रकरणात ३ फेब्रुवारी रोजी देण्यात आलेली स्थगिती निरस्त करण्याचे आदेश नुकतेच पणन संचालक पुणे यांनी दिले. या आदेशामुळे कृषी उत्पन बाजार समितीचे संचालक मंडल अडचणीत सापडण्याची शक्यता निर्माण झाली आहे

बाजार समिती संचालक मंडळाने धान्य बाजार आवारातील हायमास्ट पोल केबलिंग व इतर बायरींग मटेरियलच्या कामात शासन निर्णयानुसार कामकाज न करता आर्थिक नुकसान करून अपहार केल्याबाबतची तक्रार शेखर औगड, राहल तायडे व उमेश महिंगे बानी दाखल केली होती. जिल्हा उपनिबंधकांनी केलेल्या बौकशी अहवालात गैरहजर व विरोध नोंदविणारे संचालक वगळता इतर संचालक




मंडळासह सचिव, अभियंता यांच्यावर कार्यवाहीची शिफारस करण्यात आली. त्यावर बाजार, समितीचे सभापती हरीष मोरे, उपसभापती भैय्या निर्मळ, बांधकाम समिती प्रमुख प्रताप भुवार यांनी अपिल करून चौकशीवर स्थगिती मिळवली होती.नियमानुसार व बाजार समितीला असलेल्या अधिकारांचा वापर करून केल्याचे म्हटले आहे. बाजार समितीने ई निविदाप्रणालीचा वापर न करणे कामकाजाबाबत मंजूरीचे आदेश, कामाचे देयक या बाबी संचालक मंडळापुढे न मांडता सभापती, उपसभापती, बांधकाम उपसमिती प्रमुख तसेच सचिव यांनी परस्पर निर्णय घेणे, जाहीरात प्रसिद्धीवर बाजार समितीमधील जावक क्रमांकामध्ये खोडतोड करणे, कोटेशन उघडण्याबाबत विहीत कार्यपद्धतीचा अवलंब न करणे, कामाची अंदाजीत किमत नमूद न करणे, ठेकदारास अग्रीम रक्कम अदा करणे, साफसफाईच्या ठेक्यात गैरव्यवहार करणे असे निरीक्षण चौकशी समितीने नोंदविले आहे.या चौकशी अहवालावर जिल्हा उपनिबंधकांनी कारवाई केली नसताना अपिल दाखल करण्यात आले आहे. अर्जदारांना न्यायाधिकरणाकडे न्याय मागण्याची मुभा असल्याने त्यांची विनंती अमान्य करणे उचित ठरणार असल्याचे पणन संचालकांनी मत व्यक्त केले आहे. पणन संचालकांनी या प्रकरणांतील ३ फेब्रुवारी २०२५ ला दिलेला स्थगिती आदेश निरस्त करीत बाजार समितीचे अपील फेटाळून लावले आहे. त्याचवेळी जिल्हा उपनिबंधकांना पुढील कारवाईची मुभा दिली आहे.पणन संचालकांच्या आदेशाने बाजार समिती संचालक मंडळ चांगलेच अडचणीत सापडले आहे.

> सदर प्रकरणात कठल्याही प्रकारचा भ्रष्टाचार झालेला नाही.
>
> 
>
> जिल्हा उपनिबंधक आणि स्थळ पाहणी करावी, चौकशी अहवालच चुकीचा असल्यामुळे या प्रकरणाची पुन्हा चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येईल.
>
> **हरीश मोरे,**
> **सभापती एपीएमसी**

# मेळघाटातील चटके देण्याची डंबा प्रथा बंद व्हावी यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समिती व आरोग्य विभागाचा पुढाकार

### मेळघाटात जनजागृती मोहीम...

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१८अमरावती** – अमरावती जिल्ह्यातील मेळघाट हा आदिवासी बहुल भाग आहे मेळघाटात आजही मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा आहे, आजही आजारी पडल्यास पोटावर गरम सळाखीने चटके देण्याची प्रथा आहे नुकतंच काही दिवसांपूर्वी एका २२ दिवसीय बाळाला त्याच्या पोटावर तब्बल ६५ चटके दिल्याची घटना पुढे आली होती. या चटके देण्याच्या डंबाप्रथेमुळे अनेक बालकांचा मृत्यू देखील झालेला आहे. ही प्रथा बंद व्हावी मेळघाटातील स्त्री पुरुष मुलं व भूमका, मांत्रिक यांचं प्रबोधन व्हावं या उद्देशाने अंधश्रद्धा निर्मूलन समिती व अमरावती जिल्ह्याचा आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मेळघाटात आजपासून जनजागृती मोहीम ला सुरुवात करण्यात आलेली



आहे. यासाठी एक रथ तयार करण्यात आला असून यात अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या नंदिनी जाधव व त्यांचे सहकारी हे मेळघाटात गावागावात शाळांमध्ये, ग्रामपंचायत मध्ये गावकऱ्यांशी संवाद साधून ही प्रथा बंद करण्याविषयी जनजागृती करणार आहेत. या जनजागृती रथाला अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या मुक्ता दाभोळकर,प्रा प्रवीण देशमुख व अमरावती चे तहसीलदार विजय लोखंडे यांनी हिरवी झेंडी दाखवून रवाना केले आहे.

# कायदेविषयक शिबीरात कुष्ठरोगाबाबत जनजागृती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती–**वायगाव, ता. भातकुली येथील कायदेविषयक जनजागृती शिबिरात कुष्ठरोगाबद्दल जनजागृती करण्यात आली. सन २०२७ पर्यंत जिल्हास्तरावर कुष्ठरोग प्रसार निर्मुलनाचे ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे कायदेविषयक जनजागृती शिबीर घेण्यात आले. यात सहाय्यक संचालक आरोग्य सेवा कुष्ठरोग कार्यालयामार्फत कुष्ठरोग आजार आणि त्यासंबंधित कायदेविषयक जनजागृती करण्यात आली. आरोग्यसेवा कुष्ठरोग सहाय्यक संचालक डॉ. पूनम मोहोकार यांची चमू आणि डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी ताहेर, फैज उल्ला, स्वप्निल खंडार, अनुश्री जिचकार, क्षितिजा चिमोटे, गौरी राठी, रायना खान यांनी कुष्ठरोग आजार कायद्याबाबत पथनाट्य सादर केले.कुष्ठरोग संशयित लक्षणे असणाऱ्या समाजातील प्रत्येक घटकांनी शासकीय रुग्णालयामध्ये जाऊन स्वतःची कुष्ठरोगाचे निदान करणे गरजेचे आहे. लवकर निदान आणि लवकर उपचार महत्त्वाचे आहे. तसेच कुष्ठरोगामुळे होणारी विकृती सुद्धा टाळण्यासंबंधी माहिती देण्यात आली. बहुविध औषधोपचार कुष्ठरोगावर असणारा खात्रीशीर इलाज सर्वच शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत उपलब्ध असल्याची माहिती डॉ. मोहोकार यांनी दिली.

कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. नंदकिशोर रामटेके, प्रा. डॉ. किर्तीराज सावळे, वायगाव आयुष्मान आरोग्यवर्धिनी मंदिर येथील समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद उल्हे, कुष्ठरोग तंत्रज्ञ रितेश बथेरिया यांनी पुढाकार घेतला.

# तापी मेगा रिचार्ज प्रकल्पात अख्खे धारणी शहर जाणार ?

## चर्चा, अफवा व प्रशासनाच्या चुप्पीमुळे नागरिकांमध्ये दहशतप्लॉट, शेत, घर खरेदी-विक्रीवर स्वंयघोषित बंदी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८धारणी,** – पंतप्रधान नरेंद्र मोदी,महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री यादव यांचा आशिया खंडातील सर्वात पहिला ड्रीम प्रोजेक्ट तापी मेगा रिचार्ज प्रकल्पाच्या भविष्यात सुरूवात होईल अथवा नाही होईल. परंतु, सध्याघडीला तापी प्रकल्पात तालुक्यातील नदी काठाच्या गावांसह अख्खे धारणी शहर पुर्नवसनमध्ये जाणार असल्याच्या चर्चा व अफवांना पेव फुटले असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड दहशतीचे वातवरण आहे. याबाबत बहुतांश नागरिक संबधीत प्रशासकीय कार्यालात अधिकाऱ्यांना प्रश्न विचारत आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे काहीच उत्तर मिळत नसल्याने नागरिक संभ्रमात पडले आहे. विशेष म्हणजे याचा गंभीर परिणाम शहरातील प्लॉट, शेत व घर विक्रीच्या व्यवहार झाला असून शहरात खरेदीचे व्यवहार स्वयंघोषित पध्दतीने बंद केले असल्याचे भयानक चित्र आहे.तापी मेगा रिचार्जसाठी महाराष्ट्र व मध्यप्रदेशा शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये १९ हजार ३०० कोटींची तरतुद केल्याची घोषणा केल्याने तापी प्रकल्पाला निश्चितच सुरूवात होईल, हे स्पष्ट झाले आहे. एकीकडे तापी प्रकल्पासाठी प्रशासनाची जोरदार तयारी सुरू आहे, तर दुसरीकडे महाराष्ट व मध्यप्रदेशातील विरोधकांची सुध्दा प्रकल्पाला प्रखर विरोध करण्याची रणनिती आखण्याचे काम सुरू आहे. परंतु तापी प्रकल्पाच्या निर्माण कार्यालया कोणत्या महिन्यात सुरूवात होईल. धारणी तालुक्यासह, बुलढाणा, जवळगाव व मध्यप्रदेशातील नदी काठाच्या किती गावांचे पुर्नसन होईल, धारणी तालुक्यातील व्याघ्र प्रकल्पातील किती जंगल तापी प्रकल्पामुळे बाधित होईल. गावांचे पुर्नवसन झाल्यास त्याचे निकष काय, यासह तापी प्रकल्पाबाबत इतर संबधीत माहिती महाराष्ट्र व मध्यप्रदेशातील शासन व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी नागरिकांना




उघडपणे दिलेली नाही. विशेष म्हणजे तापी प्रकल्पाच्या कामाला धारणी तालुक्यातून व मध्यप्रदेशातील दामजीपुरा येथून सुरूवात होणार आहे. असे असले तरी प्रकल्पाचे मुख्य कार्यालय जळगाव येथे असल्याने नागरिकांना महाराष्ट्र, मध्यप्रदेश व केंद्र शासनाचा तापी प्रोजेक्टबाबत सुरू असलेला गणिमीकावा समजण्या पलिकडे आहे.

अशातच आता तापी प्रकल्पात तालुक्यातील नदी काठाच्या गावांसह अख्खे धारणी शहर पुर्नवसनमध्ये जाणार असल्याच्या चर्चा व अफवांना पेव फुटले असल्याने धारणी शहर व तालुक्यातील नागरिकांमध्ये प्रचंड दहशतीचे वातवरण आहे. याबाबत प्रस्तुत प्रतिनिधीने स्पेशल ग्राऊंड रिर्पोटींग केली असता बहुतांश नागरिक संबधीत प्रशासकीय कार्यालात अधिकाऱ्यांना प्रश्न विचारत असल्याचे दिसले. काही नागरिक तर दुय्यम निबंधक कार्यालयात जाऊन निबंधक आर. आर. बन्सोडयांनातापी प्रकल्पजाहीर झाल्याने खरेदी-विक्री सुरू आहे की नाही, हे विचारतांना दिसले. प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे शासनाकडून तापी प्रकल्पाबाबत कोणतेही पत्र आले नसल्याने अधिकारी नागरिकांना उत्तर देऊ शकत नसल्याने नागरिक संभ्रमात पडले आहे. विशेष म्हणजे याचा गंभीर परिणाम शहरातीलप्लॉट,

### नागरिकांच्या प्रश्नांची उत्तरे देता-देता अधिकारी हैराण

शेत व घर विक्रीच्या व्यवहार झाला असून शहरात खरेदीचे व्यवहार स्वयंघोषित पध्दतीने बंद केले असल्याचे भयानक चित्र आहे. आज संपत्ती विकणारा आणि घेणारा दोघेही व्यवहार करण्यास घाबरत असल्याचे विचित्र चित्र पहायला मिळत आहे. त्यामुळे शासनाने तापी प्रोजेक्टबाबत सर्व संबधीत माहिती स्पष्टपणे जाहीर करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत असल्याने दिसते.–

# नागरिकांसाठी प्यायला पाणी नाही

## तहसील कार्यालयात पाण्याचा ठणठणाटमाठ झाले शोभेची वस्तू

### १४० गावातील नागरिकांची रोज वर्दळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८चांदूर बाजार** – उन्हाळा सुरू होऊन एक महिना झाला आहे. परंतु चांदूर बाजार तहसील कार्यालयातीलपिण्याच्या पाण्याचे माठ शोभेची वस्तू ठरले आहेत. तालुक्यातील १४० गावातील लोकांची तहसील कार्यालयात दररोज मोठी गर्दी असते. तरीह कार्यालयात पाण्याची सुविधा नाही.



नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून पिण्याचे पाण्याचे माठ भरण्याची मागणी नागरीकांमधून होत आहे. तहसिल कार्यालयात सर्वाधिक प्रमाणात वृद्ध, निराधार, अपंग, विद्यार्थी, शेतकरी वर्गाची गर्दी असते. उन्हाळा सुरू होवून अनेक दिवस झाले असून देखीलपिण्याच्या पाण्याची व्यवस्था तहसील प्रशासनाने केलेली नाही. त्यामुळे नागरिकांना पाणी पिण्यासाठी दुसऱ्या ठिकाणी, बरेच लांब अंतरावर जावे लागते. तहसील कार्यालयाकडून साध्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे होत नाही ही गंभीर बाब आहे. उन्हाळ्याच्या उकाड्याने नागरिक त्रस्त होण्याआधी पिण्याच्या पाण्याची नागरिकांची होणारी गैरसोय टाळावी, अशी मागणी होत आहे. उन्हाळ्यात पाणी जास्त प्रमाणात पिण्यासाठी आरोग्य विभाग सांगतो. त्यामुळे नागरिक घराबाहेर निघताना पिण्याच्या पाण्याची बाटली सोबत ठेवतात. मात्र, अनेकवेळा घाईगडबडीत ते विसरतात. तहसीलमध्ये अनेक नागरिक येतात. पाण्याची बाटली विकत घेऊन पिण्याची प्रत्येकाची परिस्थिती नसते. काही वृद्ध, निराधार, अपंग आदी नागरिक, शेतकरी कामानिमित्त तहसील कार्यालयात येत असतात. पाण्याची माठ अनेक दिवसा अडगळीत ठेवलेले आहे. ते नांदुरस्त असल्याने त्यांना पिण्याचे पाणी मिळत नाही. नागरिकांची होणारी गैरसोय थांबवून पिण्याच्या पाण्याच्या माठाची त्वरित सुविधा उपलब्ध करावी, अशी मागणी नागरिकांकडुन होत आहे.

# खरच जिल्ह्याचा विकास होईल.....

## आता जिल्ह्यात 3 खासदार....१२ आमदार...

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती**

संघटन कौशल्य, नेतृत्व क्षमता, व्यवस्थापन, सर्व पक्षांमध्ये जनसंपर्क व समन्वय...., दुरदृष्टी,विकासात्मक व्हिजन... त्यात आणखी भर म्हणजे अमरावती जिल्ह्याच्या राजकारणातील चाणक्य व किंग मेकर म्हणून ओळख असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते संजय खोडके आता आमदार होण्याचा मार्ग मोकळा झालाय. गेल्या ३५ वर्षापासून उपमुख्यमंत्री अजितदादा पवारयांच्यासोबत असलेल्या निष्ठेचे फळत्यांना मिळाले आणि जिल्ह्याला १२ वा आमदार मिळाला.





राकाँच्या वाट्याला महायुतीमधून एक आमदार आल्यानंतर या आमदारकीवर अनेकांचे डोळे असताना दादांनी संजय खोडके यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले, यावरून खोडकेंची पक्षात असलेली छाप वेगळी सांगायला नको. त्यामुळे आता संजय खोडके यांना मिळणार असलेल्या जबाबदारीनंतर अमरावतीकरांना आता राज्याच्या मंत्रिमंडळात मंत्रिपदाची आस आणि विकासात्मक दृष्टीकोनातून आशा अपेक्षा वाढलेल्या आहेत.

जिल्ह्यात आता ३ खासदार आहेत. अमरावती लोकसभा मतदार संघाचे खासदार बळवंत वानखडे तर राज्यसभेवरील खा. डॉ. अनिल बोंडे... तसेच जिल्ह्यातील नांदगाव खंडे, चांदुर रेल्वे, धामणगाव रेल्वे आणि वरुड तालुके वर्धा लोकसभा मतदार संघात असल्याने वर्धा लोकसभा मतदार संघाचे खा. अमर काळे... असे एकूण तीन खासदार आहे. भविष्यात आणखी एखादा राज्यसभा खासदार जिल्ह्याला मिळण्याची आशा आहे. सोबत आठ विधानसभा मतदार संघात अमरावती – सुलभा खोडके, बडनेरा– रवि राणा, धामणगाव –प्रताप अडसड, तिवसा– राजेश वानखडे, मोर्शी– उमेश यावलकर, अचलपूर – प्रवीण तायडे, दर्यापूर– गजानन लवटे आणि मेळघाट केवलराम काळे असे एकूण आठ आमदार आहे.

सोबतच शिक्षक मतदार संघातून किरण सरनाईक, शिक्षक पदवीधर मतदार संघातून धिरज लिंगाडे तर मुळचे अमरावतीचे असलेले श्रीकांत भारतीयहे तीन आमदार विधानपरीषदेवर आहेत. एक स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक न झाल्यामुळे प्रवीण पोटे यांचा कार्यकाळ संपल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थेतील आमदारकीचे पद रक्त आहे.

त्यात आता महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पाच रिक्त जागांसाठी येत्या गुरुवार २७ मार्च रोजी होणाऱ्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या वतीने संजय खोडके यांना एकमताने अधिकृतरित्या उमेदवारी जाहीर करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस र्टीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांनी याबाबत अधिकृत घोषणा कल्या नंतर त्यांनी सोमवार १७ मार्च रोजी संजय खोडके आपला मेदवारी अर्ज दाखल केला आणि एकमेव असल्यामुळे संजय खोडके यांच्या आमदारकीचा मार्ग मोकळा झाला.

**अमरावतीकरांच्या आशा–अपेक्षा वाढल्या**

संजय खोडके यांच्या रुपाने आता अमरावतीला १२ वा आमदार मिळणार आहे. आतापर्यंत जिल्ह्यातून ११ आमदार, तीन खासदार असताना ना जिल्ह्याला केंद्रात वा राज्यात साधे मंत्रिपद मिळाले नाही. पालकमंत्री सुद्धा जिल्ह्याबाहेरील आहेत. त्यामुळे आता १२ आमदार झाल्यानंतर तरी अमरावती जिल्ह्याला राज्याच्या मंत्रिमंडळात स्थान मिळेल, अशी आशा अपेक्षा अमरावतीकरांना लागलेली आहे.

**एकाच घरात दोन आमदार**

यापूर्वी अमरावतीत माजी खासदार नवनित राणा, तर आमदार म्हणून रवि राणा विधानसभेवर होते. आता त्यानंतर अमरावतीच्या आमदार म्हणून सुलभा खोडके यांच्यानंतर त्यांचे पती संजय खोडके यांचा विधान परीषदेवर जाण्याचा मार्ग मोकळा झाला. त्यामुळे आता एकाचघरात दोन आमदार राहणार आहेत. संजय खोडके हे विदर्भातील पक्षाचे मोठे नेते असून ते आमदार सुलभा खोडके यांचे पती आहे. त्यामुळे आगामी काळात विधान भवनात पती–पत्नी आमदार पाहायला मिळणार आहेत.–

# बीबीएनजीच्या जळगाव चॅप्टर चा थाटात शुभारंभ



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ जळगाव–** जळगाव –व्यवसायिकता ही आत्मनिर्भर भारत यासाठी आवश्यक असून ब्राह्मण व्यवसायिकांनी एकत्र येऊन देश व समाजासाठी कार्य करावे असे प्रतिपादन देशातील ब्राह्मण व्यवसायिकांची सर्वात मोठी संस्था ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल बी बी एन जी चे संस्थापक व अध्यक्ष श्री श्रीपाद कुलकर्णी यांनी केले. ते बीबीएनजीच्या जळगाव शाखेचा शुभारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

उद्घाटन समारंभात नेटवर्किंग द्वारे व्यवसाय वृद्धी या विषयावर त्यांनी आपले विचार मांडले. यावेळी मंचावर बीबीएनजी चे सहयोगी संचालक व अशोका बिल्डकॉन लिमिटेड चे संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजय लोंढे तसेच प्रख्यात माध्यम व जनसंपर्क सल्लागार आणि बीबीएनजी चे सहयोगी संचालक डॉ. अभिजीत चांदे उपस्थित होते.

बीबीएनजी च्या कार्याची माहिती देताना श्री. श्रीपाद कुलकर्णी यांनी समर्थ समृद्ध आणि संपन्न ब्राह्मण व्यवसायिक कसे व्हाल यावर मार्गदर्शन केले. आपल्या मनोगतात संजय लोंढे यांनी नेटवर्किंग मुळे व्यवसाय कसा वाढतो याची विस्तृतपणे माहिती दिली. ह्या कार्यक्रमा साठी सर्व शाखीय व सर्व भाषिक ब्राह्मण व्यवसायिक उपस्थिती होते. त्याच बरोबर शेगाव, भुसावळ, धरणगाव, छत्रपती संभाजी नगर, नाशिक आणि पुणे येथील ब्राह्मण व्यावसायिक उपस्थिती होते.

**जळगाव शाखेच्या शुभारंभा च्या कार्यक्रमात नूतन पदाधिकाऱ्यांचे पदग्रहण**

संस्थापक अध्यक्ष श्री. श्रीपादजी कुलकर्णी यांच्या उपस्थितीत गार्डियन म्हणुन श्री. सचिन दुनाखे, चॅप्टर प्रमुख म्हणुन श्री. नितीन बापट, सेक्रेटरी म्हणुन डॉ. पराग कुलकर्णी आणि कोषाध्यक्ष म्हणुन श्री. समीप मदाने यांचे पदग्रहण संपन्न झाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. रश्मी गोखले श्री. प्रसन्न मांडे, श्री. श्रीकृष्ण पटवर्धन, श्री. अनिरुद्ध कोटस्थाने यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ. केतकी कुलकर्णी यांनी केले तर आभार डॉ. पराग कुलकर्णी यांनी मानले.

# शेतातील विहिरीत आढळला मानवी हाडांचा सापळा


## पाच, सहा दिवस पाण्यात भिजल्याने मास विरगळले

### अंजनगाव बारी शिवारातील धक्कादायक घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अंजनगाव बारी–** बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या अंजनगाव बारी गावालगतच्या शिवारातील एका शेतातील विहीरीत कवटीसह संपूण मानवी हाडाचा सापळा आढळल्याने अचानक खळबळ उडाली.

पाच ते सहा दिवस मृतदेह पाण्यात भिजला असल्याने शरीरावरील मास विरगळले असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. पोलिसांनी मृतकाची ओळख पटविण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न सुरू केले आहे.



माहितीनुसार, बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या यवतमाळ मार्गावरील अंजनगाव बारी गावालगतच्या शिवारातील एका शेतातील विहिरीतून प्रचंड दुर्गध येत होता. एखादे जनावर तर विहिरीत पडले नाही म्हणून शेत मालकाने विहिरीमध्ये डोकावून पाहिले असतांना हाडांचा सापडा दिसला. त्यामुळे त्यांनी तात्काळ बडनेरा पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच बडनेरा पोलिस ठाण्याचे ठाणेदार सुनील चव्हाण तात्काळताफ्यासह घटनास्थळी दाखल झाले.

तसेच तेथे श्वान पथक व ठसे तज्ज्ञांना सुध्दा प्राचारण करण्यात आले. पोलिसांनी अग्निशमनच्या पथकाला प्राचारण करून हाताचा सापडा बाहेर काढला असता कवटीसह संपूर्ण मानवी सांकाडयावर काही ठराविक जागीच मास होते. मृतकाने पाच ते सहा दिवसांपूर्वी विहिरीत उडी घेतली असावी किंवा कुणी त्याला विहिरीमध्ये टाकले असावे. सहा दिवस पाण्यात मृतदेह भिजल्याने अंगावरील मास विरगळले असावे, असा अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे. वृत्तलिहेस्तोव मृतकाची ओळख पटली नव्हती. तुर्तास याबाबत पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पोलिस पुढील तपास करित आहेत.–

# मिस्टर ग्रीन भारत स्पर्धेत डॉ. संदीप कंठाळे ठरले उपविजेते

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ अमरावती :**

येथील प्रसिध्द दंतशल्य चिकित्सक डॉ. संदीप कंठाळे यांनी पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवरील सौंदर्य स्पर्धेत अमरावतीचा नावलौकीक वाढविला आहे.

कोल्हापूर येथे झालेल्या या स्पर्धेत डॉ. कंठाळे उपविजेते ठरले आहेत.गौरा मिस, मिसेस, मिस्टर ग्रीन भारत व भारत वस्त्र शृंगार २०२५ तसेच गौरा यशश्री पुरस्कार २०२५ (सिजन–७) ची अंतिम फेरी कोल्हापूर येथील हॉटेल हाईलॅण्ड क्लब येथे मोठ्या उत्साहात पार पडली. या सौंदर्य स्पर्धेत संपूर्ण भारतातून १५०० पेक्षा जास्त स्पर्धक सहभागी झाले होते. अंतिम फेरीत ३५ स्पर्धकांनी धडक मारली. त्यांचे पाच दिवसांचे ग्रुमिंग वर्कशॉप गगनबावडा कोल्हापूर येथे घेण्यात आले.ज्यामध्ये स्पर्धकांना देहबोली, संभाषण कला, रॅम्प वॉक, कॅट वॉक अशा विविध स्पर्धेतून जावे लागले. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील ज्युरींनी मूल्यांकन केले. या स्पर्धेमध्ये मिस्टर ग्रीन चा किताब जम्मू येथील संदीप रैना यांनी पटकाविला, तर अमरावतीचे डॉ. संदीप कंठाळे हे उपविजेते ठरले. तर नागपूर येथील आदित्य राजे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला.डॉ. संदीप कंठाळे हे अमरावती शहरातील युवकांसाठी आयकॉन ठरले आहेत.

यापूर्वीही त्यांनी अनेक स्पर्धा गाजविल्या आहेत.या स्पर्धेच्या आयोजक गौरी नाईक, जयंत पाटील, सिध्दार्थ नाईक यांनीही डॉ. कंठाळे यांच्या यशाबद्दल कौतुक केले असून यापुढेही अशा स्पर्धा राष्ट्रीय पातळीवर आयोजित केल्या जातील असे नमूद केले आहे.



# महिलांसाठी तक्रार निवारण समिती स्थापन न केल्यास दंड

## जिल्हा महिला व बालविकास अधिकारी डॉ. उमेश टेकाळे यांचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ अमरावती–** साधारणतः १० किवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत असणार्या शासकीय व खासगी आस्थापनांच्या ठिकाणी नोकरी किया व्यसाय करणार्या महिलांच्या लैंगिक राजवणुकीस प्रतिबंध करण्यासाठी व तक्रारीची चौकशी करण्यासाठी अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करणे बंधनकारक आहे, मात्र समिती स्थापनन केल्यास ५० हजार रूपयांपर्यंत दंडही केल्या जाऊ शकतो, असा इशारा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी डॉ. उमेश टेकाळे यांनी दिला आहे.

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनिगम २०१३ मधील तरतुदीनुसार सर्व शासकीय कार्यालय, स्थानिक प्राधिकरणांची कार्यालय, खासगी कार्यालयांमध्ये तसेच १० किया त्यापेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत असणार्या सर्व संस्था, संघटना, मंडळ, कंपनी, कारखाना, रुग्णालय, शाज्य महाविद्यालय, हॉटेल, दुकाने, बैंक आदी कार्यालग प्रमुखांनी किवा संबंधित आस्थापना मालकांनी आवश्यक अशी समिती स्थापन करण्याची कार्यवाही करावी असे आवाहन महिला व बालविकास विभागाकडून करण्यात आले आहे, सर्वोच्च न्यायालयाने देखील अंतर्गत तक्रार समिती स्थापन करण्याचाबत निर्देश दिलेले आहेत त्यामुळे समिती स्थापन न करणार्या कार्यालय प्रमुख मालकांना ५०हजार रुपयांपर्यंत दंड केला जाऊ शकतो. त्यानुसार शासकीय, खासगी कार्यालयांतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करावी, तसेच २०२४–२५ या वार्षिक आहवाल जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयात सादर करावा, यापुढेही मासिक व त्रैमासिक अहवाल नेहमी सादर करावे, अता सूचना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आल्या आहेत.

# प्रा.डॉ.अभिजीत मुळे पाटीलआचार्य पदवीने सन्मानित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ बार्शीटाकळी** – संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नीत प्रतिभा शिक्षण प्रसारक मंडळ जनुनाद्वारा संचालित गुलाम नबी आझाद कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बार्शीटाकळी येथीलप्रा. डॉ अभिजीत मुळे हे नुकतेच आचार्य पदवीने (झहऊ) सन्मानित झालेत.यापूर्वी त्यांनी पदव्युत्तर पदवीत समाजशास्त्र ह्या विषयामध्ये ८५ टक्के गुण प्राप्त करूनपदवी मिळवत.णत्र्छ–छएढ परीक्षा वचक–डएढ ह्या परीक्षाही पहिल्या प्रयत्नामध्येच उत्तीर्ण केल्या आहेत.सोबतच प्रा.डॉ.दिपक चौरपगार यांच्या मार्गदर्शनात अकोला जिल्ह्यातील महिला सफाई कर्मचारी यांचे समाजशास्त्रीय अध्ययन या विषयात आचार्य पदवी संपादन केली आहे, याचे श्रेय डॉ दीपक चौरपगार तसेच आई प्रा.किरण महेंद्र मुळे पत्नी सौ दिपाली मुळे तसेच प्रतिभा शिक्षण प्रसारक मंडळ जनुना शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ मधुकरराव पवार यांना देतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ बिस्मिल्ला खान उप प्राचार्य डॉ संतोष हुशे समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ दीपक चौरपगार, डॉ प्रवीणकुमार राठोड ,प्रा आदित्य पवार, डॉ प्रवीण देशमुख, डॉ अमित वैराळे, डॉ सिद्धार्थ वाघमारे, प्रा संजय चव्हाण डॉ संतोष सुरडकर, डॉ धनंजय खिराडे, डॉ मोहन बल्लाळ यांनी त्यांचे अभिनंदन केले



प्रा डॉ अभिजीत मुळे हे गुलाम नबी आझाद कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बार्शीटाकळी येथे समाजशास्त्र विभागांमध्ये सहाय्यक प्राध्यापक तासिका तत्त्वावर म्हणून कार्यरत आहेत त्यांच्या या यशाबद्दल संपूर्ण अकोला जिल्यात स्वागत केल्या जात आहे.!

# ७८ टक्के थकबाकीदारांचा 'अभय'ला ठेंगा, वीज खंडित असताना पुरवठा होतो कुठून?; यंत्रणाच गैरमार्ग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अकोला**

थकबाकीमुळे कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित ग्राहकांसाठी थकबाकीवरील व्याज व विलंब आकाराच्या संपूर्ण माफीसह पुनर्जोडणीची अभय योजना महावितरणकडून राबवली जात आहे. मात्र, ७८ टक्के थकबाकीदारांनी अभय योजनेला ठेंगा दाखवला. केवळ २२ टक्के थकबाकीदारांनी योजनेचा लाभ घेऊन घरे पुन्हा प्रकाशमान केली. कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित असल्यावरही काही ठिकाणी गैर मार्गाने विजेचा वापर केला जातो. महावितरणची यंत्रणाच तो मार्ग दाखवत असल्याचा धक्कादायक प्रकार सुरू आहे.




वीजबिल न भरल्यामुळे ३१ मार्च २०२४ पूर्वी कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित वीज ग्राहकांच्या थकबाकीमुक्तीसाठी महावितरणने १ सप्टेंबर २०२४ ला अभय योजना सुरू केली. मुळ थकबाकी भरल्यानंतर व्याज आणि विलंब आकारात संपूर्ण माफी शिवाय मुळ थकबाकीची ३० टक्के रक्कम एकरकमी भरल्यास उर्वरित ७० टक्के रक्कम सहा हप्त्यात भरण्याची सुविधा घरगुती व व्यावसायिक ग्राहकांनी एकरकमी थकीत बिल भरल्यास त्यांना १० टक्के अतिरिक्त सवलत आणि उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच टक्के अतिरिक्त सवलत आदी योजनेत लागू केले.

अकोला परिमंडळात योजनेंतर्गत ५९ हजार ९८१ थकबाकीदार ग्राहक पात्र होते. त्यातील केवळ १३ हजार ४३९ थकबाकीदार ग्राहकांनी योजनेचा लाभ घेतला. त्यापैकी १० हजार ३२६ ग्राहकांची घरे पुन्हा प्रकाशमान झाली असून तीन हजार ११३ ग्राहक पुनर्जोडणी न घेता फक्त थकबाकीतून मुक्त झाले. पुनर्जोडणी घेणाऱ्या १० हजार ३२६ मध्ये अकोला दोन हजार ६३८, बुलढाणा पाच हजार ०२० आणि वाशीम जिल्ह्यातील दोन हजार ६६८ ग्राहकांचा समावेश आहे.

# २२ मार्च २०२५ ते २५ मार्च २०२५ सायन्सकोर मैदानात वैदर्भी महोत्सव जागर स्त्री शक्तीचा जिल्हा प्रदर्शनाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

ग्रामविकास व पंचायत राज विभाग, जिल्हा परिषद अमरावती, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, महिला व बाल विकास विभाग, समाजकल्याण विभाग, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) आणि उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने वैदर्भी महोत्सव : जागर स्त्री शक्तीचा या जिल्हा प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येत आहे. हे प्रदर्शन दि. २२ मार्च २०२५ ते २५ मार्च २०२५ या कालावधीत मुख्य बस स्थानकासमोर, सायन्स कोअर मैदान, अमरावती येथे होणार आहे.



या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता समूहातील महिलांचे जीवनमान उंचावणे, त्यांचे सक्षमीकरण करणे आणि उपजीविकेसाठी आधारित उपक्रमांना चालना देणे हा आहे. या अंतर्गत स्वयंसहाय्यता समूहांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. प्रदर्शनात अमरावती जिल्ह्यातील १०५ स्वयंसहाय्यता समूहांचे स्टॉल्स असणार असून, यामध्ये ग्रामीण भागातील रुचकर खाद्यपदार्थ आणि कलाकुसरीच्या वस्तूंची विक्री होणार आहे.

या प्रदर्शनात महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध प्रशिक्षणांचेही आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये मायक्रोनपासून वस्तू तयार करणे, ज्वेलरी आर्ट, बांबू क्राफ्ट, दिव्यांग स्वयंसहाय्यता समूहांसाठी उद्योजकता आणि कौशल्य विकास, फोटोग्राफी-व्हिडिओग्राफी, रेशीम ज्वेलरी, मेहंदी प्रशिक्षण आदींचा समावेश आहे. तसेच, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांनी प्रदर्शनाची रंगत वाढणार आहे.जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती संजीता महापात्र यांनी सर्व शासकीय विभाग, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांना या प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन केले आहे. त्या म्हणाल्या, ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता समूहातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि आत्मनिर्भर बनवण्यासाठी त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची खरेदी करा. चला, या वैदर्भी महोत्सवात सहभागी होऊया आणि ग्रामीण महिलांना प्रोत्साहन देऊया!

अमरावतीतील नागरिकांसाठी हे प्रदर्शन नेहमीच आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले असून, यंदाही मोठ्या संख्येने लोकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.

**मैदानाची पुन्हा वाट लागणार**

ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता समूहातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि आत्मनिर्भर बनवण्यासाठी त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची खरेदी करा. चला, या वैदर्भी महोत्सवात सहभागी होऊया आणि ग्रामीण महिलांना प्रोत्साहन देऊया!असे आवाहन जरी करण्यात आले असले तरी प्रदर्शनी मुळे या मैदानाची पुन्हा वाट लागणार हे मात्र निश्चित याचे कारण म्हणजे या ठिकाणी कोणत्याही प्रकारची व्यवस्था महोत्सवातील नागरिकांसाठी नसते त्यामुळे वाटेल तेथे कचरा फेकणे वाटेल तेथे शौचालयास बसणे,लघुशंका करणे हि बाब प्रदर्शनी काळात नित्याचीच होते त्यामुळे या बाबींकडे लक्ष देणे तेवढेच गरजेचे आहे.

# '१५ दिवसात वाळू मिळणार, अन्यथा कारवाई करणार'; महसूलमंत्र्यांची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि..१८ मुंबई २८**

विधिमंडळात वाळू तस्करीवरुन भाजपा आमदार सुधीर मुनगंटीवार आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जुगलबंदी पाहायला मिळाली. यानंतर बावनकुळे यांनी राज्य सरकारकडून लवकरच नवीन वाळू धोरण लागू करण्यात येणार असल्याची घोषणा केली. या नवीन धोरणानुसार आता घरकुलधारकांना अर्ज केल्यानंतर १५ दिवसात वाळू मिळणार आहे. वाळू न मिळाल्यास तहसिलदारांवर कारवाई करण्यात येईल, अशी




माहिती मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधिमंडळात दिली.

पंधरा दिवसात वाळू दिली नाही तर तहसीलदारांवर कारवाई करणार का? मग धृतराष्ट्र सुद्धा कसे काम करतात हे पाहा, गाडी पकडली की त्या गाड्या सरकार जमा करा, असा निर्णय आम्ही वनविभागात घेतला होता. तसा निर्णय तुम्ही घेणार का? असा प्रश्न सुधीर मुनगंटीवार यांनी केला. यावर बोलताना मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, सुधीर भाऊ यांनी अत्यंत महत्वाची गोष्ट मांडली आहे. तहसीलदारांनी १५ दिवसात वाळू दिली पाहिजे. अन्यथा त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, अशी तरतूद केली जाईल. सुधीर मुनगंटीवार यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्याचा अभ्यास करुन निर्णय घेण्यात येईल, असंही चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

आठ दिवसात वाळू धोरण ठरवले जाईल. वाळू संदर्भात आतापर्यंत २८५ सूचना आल्या आहेत. यासाठी आता बाहेरील राज्यातील वाळू धोरणांचा अभ्यास करणार आहे. दगडापासून केलेली वाळू मोठ्या प्रमाणात वापरायची आहे. यासाठी क्रेशर्सना उद्योगाचा दर्जा देऊन सबसिडी देण्यात येणार आहे, असंही बावनकुळे म्हणाले. घरकुलांना ५ ब्रास वाळू देण्यात येणार आहे. दरम्यान, यावेळी भंडारा जिल्ह्यातील वाळू तस्करीवरुन प्रश्न उपस्थित करण्यात आले. भंडारा जिल्ह्यातील वाळू तस्करीची चौकशी करण्याचे आदेश मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

# वांगी, पत्ताकोबी, फूलकोबी, टोमॅटोचे दर मातीमोल; आवक वाढल्याचा परिणाम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

आवक वाढल्याने भाजीपाल्याचे दर कमालीचे गडगडले आहेत. फूलकोबी, पत्ताकोबी, टोमॅटो, वांगी १० रुपये प्रतिकिलो दराने विक्री होत आहे. पालक, कांदापात यासह इतर काही पालेभाज्यांचेही भाव पडले आहेत. भाजीपाला लागवडीचा खर्चही निघत नसल्याने शेतकरी संकटात आहेत. खर्च भागवायचा तरी कसा, असा प्रश्न विचारीत संताप व्यक्त करीत आहेत.

रब्बी हंगामाची काढणी झाल्यानंतर उपलब्ध पाण्यावर अनेक शेतकऱ्यांनी भाजीपाल्याची लागवड केली. यामुळे शहरातील बाजारात भाज्यांची, भाजीपाल्यांची आवक वाढली आहे.



गत २० दिवसांपासून शहरात लसूण व अद्रक ५० रुपये प्रतिकिलो दराने विक्री होत आहे. टेम्पो ठिकठिकाणी ग्राहकांना माल विक्रीसाठी आकर्षित करताना दिसून येत आहे. त्यातच पांढरा व लाल कांदाही १५ ते २० रुपये प्रतिकिलो दराने विकला जात आहे.ठोक बाजारात किरकोळ बाजारापेक्षा ५० टक्के कमी दराने कोबी, वांगी, टोमॅटोची विक्री होत आहे. यामुळे शेतकऱ्यांना भाजीपाल्याची काढणी करून विक्री करण्यासाठी लागणारा वाहतूक खर्चही मिळत नाही. शेतकरी मेटाकुटीला आला आहे.

यंदा जिल्ह्यात बहुतांश शेतकऱ्यांनी भाजीपाल्याची शेती केली आहे. यामुळे बाजारात आवक वाढली आहे. भंडारा शहरात रविवारी भरणाऱ्या आठवडी बाजारात फळभाज्यांसह पालेभाज्यांची आवक अधिक होती. सर्वत्र पालेभाज्या व फळभाज्यांचे ढीग दिसून आले.

सध्या अपवाद वगळता सर्वच भाजीपाला १० ते ३० रुपये किलोने विक्री होत आहे. मात्र, दिवसेंदिवस उन्हाची तीव्रता वाढत आहे. यामुळे आवक कमी होऊन भाजीपाल्याचे दर दुपटीने चढण्याची शक्यता आहे.गत महिनाभरापासून टोमॅटो व वांग्याचे दर कमालीने गडगडले आहेत. बाजारात मागणीपेक्षा पुरवठा अधिक होत असल्याने रविवारी टोपलीभर वांगी व टोमॅटो १० रुपयात विकले गेले.

# धामणगाव - हिंगणगाव -निंबोली रस्त्याची झाली चाळण ; रस्त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले

## आठ दिवसांत रस्त्या संदर्भात निर्णय न घेतल्यास रास्ता रोको आंदोलन सरपंच दुर्गाबक्षसिंह ठाकूर यांचा बांधकाम विभागाला अल्टिमेटम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८धामणगाव रेल्वे**

धामणगाव - परसोडी - हिंगणगाव -निंबोली या रस्त्याची अक्षरश: चाळण झाली आहे. रस्त्यावर मीठमोठे खड्डे पडले असून या रस्त्यावर वाहन चालवणे जिकिरीचे व कठीण होऊन बसल्याने वाहनचालकासह विद्यार्थी हैराण झाले आहेत. तालुक्यातील सर्वात खराब मार्ग म्हणून या रस्त्याची ओळख निर्माण झाली आहे. या खराब रस्त्यासंदर्भात वारंवार तक्रारी करून देखील सबंधित अधिकारी या रस्त्याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करीत असल्याचा आरोप हिंगणगाव चे सरपंच दुर्गाबक्षसिंह ठाकूर यांनी केला असून येत्या आठ दिवसांत रस्त्या संदर्भात निर्णय न घेतल्यास रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा कार्यकारी अभियंता यांना दिला आहे.




धामणगाव वरून परसोडी -हिंगणगाव व निंबोली पर्यंत जाणारा डांबरी रस्ता अनेक दिवसापासून पूर्णपणे उखडलेला आहे व मोठमोठे गड्डे पडलेले आहे.काही वेळेस ते खड्ड्यामध्ये पॅचेस केल्यामुळे पूर्ण रोड ओबळ धोबळ झालेला आहे.मोटर सायकल चालवणे त्या रस्त्यानेने अवघड झालेले आहे अनेकांचे त्या रोडच्या खड्ड्यामुळे व प्याचेस भरून उंच खाली झालेल्या या रोडवर पडुन अनेक अपघात होत आहे. या रस्त्यावर हिंगणगाव पर्यंत आय.टी.आय कॉलेज, फार्मसी कॉलेज व शासकीय निवासी शाळा असल्यामुळे नेहमी विद्यार्थ्यांची वर्दळ असते.यामुळे विद्यार्थ्यांना अतोनात प्रमाणात त्रास होत आहे. अनेक विद्यार्थ्यांचे मोटरसायकलने पडून अपघात सुद्धा झालेले आहे.संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता नरेंद्र वानखडे यांना विचारणा केली असता त्यांनी माहिती दिली की ह्याम अंतर्गत मागे मोजमाप करून सर्वे झाला होता परंतु हा रोड नामंजूर झालेला आहे.त्यामुळे मार्चच्या अंदाजपत्रकात हा रस्ता मंजूर करून रस्ता तयार करण्यात यावा.अन्यथा येत्या आठ दिवसांत रस्त्यासंदर्भात निर्णय न झाल्यास रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.आमदार प्रताप अडसड यांची प्रत्यक्ष भेट घेवून समस्या सांगितली असून त्यांनी समस्येचे निराकरण करण्याचे आश्वासन दिले आहे,असे दुर्गाबक्ष सिंह ठाकुर यांनी सांगितले.

# २४ वर्षांत ४९ हजारांवर शेतकरी आत्महत्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

राज्यात २४ वर्षांत तब्बल ४९ हजारांवर शेतकरी अस्मानी आणि सुल्तानी संकटांचे बळी ठरल्याचे धक्कादायक वास्तव निदर्शनास आले आहे. यातील सर्वाधिक २१,१२० शेतकरी आत्महत्या पश्चिम विदर्भात झाल्या असून, त्याखालोखाल मराठवाड्यात १२,५१२ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले. शेतकऱ्यांचा जीवनस्तर सुधारण्यासाठी कृषी विभागाच्या ३५ योजना असल्या तरी 'डीबीटी'च्या लॉटरी पद्धतीमुळे गरजू शेतकऱ्यांना लाभ मिळेलच, याची खात्री नसल्याने बळीराजाच्या संघर्षावर नैराश्य भारी पडत आहे.

पश्चिम विदर्भातील ५, पूर्व विदर्भातील एक आणि मराठवाड्यातील ८ अशा १४



जिल्ह्यांत शेतकरी आत्महत्यांची स्वतंत्र नोंद ठेवली जाते. अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांत गतवर्षी १,०५१, नागपूर विभागातील वर्धा जिल्ह्यात १०४, तर छत्रपती संभाजीनगर विभागात ९४८ अशा २,१०३ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले. यातील ९८१ प्रकरणे शासन मदतीसाठी पात्र, ४१४ अपात्र, तर ७११ प्रकरणे प्रलंबित आहेत.

**शेतकरी आत्महत्या**

अमरावती विभाग - यवतमाळ ६,२३०, अमरावती ५,४०४, बुलढाणा ४,४५३, अकोला ३,१४१, वाशिम २,०५८

**आत्महत्या प्रकरणात**

२३ जानेवारी २००६ च्या आदेशानुसार एक लाख रुपयांची मदत देय आहे. ३० हजारांचा चेक तर ७० हजार पोस्ट/बँकेच्या मासिक प्राप्ती योजनेमध्ये मृत शेतकऱ्यांच्या वारसाच्या नावे जमा करण्यात येतात. यामध्ये १९ वर्षांमध्ये वाढ करण्यात आलेली नाही.

# धारणीत छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी

## बाईक रॅली ने शिवरायांचा जय जय कार ,शहर भगवामय : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ धारणी**

महाराष्ट्रा चे आद्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची सोमवार ला तिथीनुसार जयंती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे राजू उर्फ शैलेंद्र मालवीय उपजिल्हाप्रमुख यांच्या मार्गदर्शनात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेच्या पूजन व हार अर्पण




करून भूतेश्वर महादेव मंदिर पासून शहरात बाईक रॅली काढण्यात आली ही रॅली धारणी बस स्टेशन पासून तर राम मंदिर ते होळी चौक होऊन गजानन महाराज मंदिर परत भुतेश्वर महादेव मंदिर येथे आली , रॅलीत असंख्य शिवसैनिकांनी सहभाग घेतला भगवा झेंडा भगवा दुपट्टा रॅलीचे आकर्षण होते तसेच जय भवानी जय शिवाजी च्या जय घोषणे रॅली सर्व लोकांना आकर्षित करत होती , रॅली परत आल्यानंतर भूतेश्वर महादेव मंदिरा जवळ छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास त्यांनी स्वराज्या करीता दिलेले बलिदान त्यांचे गड किल्ले या वर प्रकाश टाकत शिवसैनिकांनी भाषण केले तसेच त्यांच्या जीवनावर आधारित प्रसंग उपस्थित शिवसैनिकांना दिले , या रॅली त प्रामुख्याने दयाराम सोनी मेळघाट संघटक, तालुका प्रमुख राजू राठोड , न प चे माजी उपाध्यक्ष सुनील चोथमल, शहर प्रमुख दिनेश धनेवर , राजकुमार मोहोड , घनश्याम राठोड, अशोक वसु , अजय राठोड , रतिलाल पटोरकर, जयशंकर गुप्ता , अस्सू शेख , अमीन शेख, हा कार्यक्रम यशस्वी करण्या साठी सर्व शिवसैनिकांनी परिश्रम घेतले .

# महाराष्ट्रात ४० हजार बांगलादेशी जन्म प्रमाणपत्र रद्द - भाजपा नेते किरीट सोमय्या यांची माहिती

## तहसीलदारांनी दिलेली विदर्भातील चार जिल्ह्यात १९ हजार ७६२ जन्म प्रमाणपत्र बेकायदेशीर; किरीट सोमय्या पुन्हा अमरावती दौऱ्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**



बांगलादेशी रोहिंग्या जन्म प्रमाणपत्र घोटाळ्या बाबत भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी आज पुन्हा अमरावती दौऱ्यावर येत अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या दालनात बैठक घेतली... यात त्यांनी अमरावतीच्या जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांना लक्ष करत यासंदर्भात ते सहकार्य करत नसल्याचं त्यांनी म्हटलं, तसेच अमरावती जिल्ह्यात १५ हजार जन्म प्रमाणपत्र पैकी आठ हजार जन्म प्रमाणपत्र बेकायदेशीर रित्या नायबतहसीलदारांनी सुनावणी केली असा आरोप केला, तर राज्यात ४० हजार बोगस जन्म प्रमाणपत्र रद्द करण्यात आले अशी माहिती किरीट सोमय्या यांनी दिली.. अमरावती, यवतमाळ, नागपूर व अकोला या विदर्भातील चार जिल्ह्यातील ३२ तालुक्यातील १९हजार ७६२ बेकायदेशीर जन्म प्रमाणपत्र आहे.. अमरावतीमध्ये बोगस जन्म प्रमाणपत्र बाबद १०० गुन्हेगारांची यादी मी आधीच पोलिसांना दिली, महसूल विभागाच्या संगनमताने हा घोटाळा झाला असा गंभीर आरोप देखील त्यांनी केला, तर बांगलादेशी रोहिंग्या यांना बनावट जन्म प्रमाणपत्र बाबत महाराष्ट्रात एकूण २० ठिकाणी गुन्हे दाखल झाले अशी माहिती देखील सोमय्या यांनी दिली.

नागपूर हिंसाचारावर आपली प्रतिक्रिया देत किरीट सोमय्यांम्हणाले कि औरंगजेबाचे कौतुक सहन करणार नाहीनागपूरमध्ये उसळलेल्या हिंसाचारावर भाजप नेते किरीट सोमय्या यांनी आज १८ मार्च रोजी अमरावती दौऱ्यावर असताना प्रतिक्रिया दिली. त्यांनी विरोधकांवर टीका करताना औरंगजेबाच्या कौतुकाला तीव्र विरोध दर्शवला.सोमय्या म्हणाले, काही लोकांना औरंगजेबाला हिरो बनवायचं आहे, पण महाराष्ट्रात हे सहन केलं जाणार नाही. औरंगजेब हा एक क्रूर राजा होता. त्याची कबर वास्तू म्हणून जपली जात आहे, पण त्याचे कौतुक आम्ही सहन करणार नाही.ते म्हणाले की, सरकारच्या जबाबदाऱ्या असतात, त्यामुळे काही गोष्टींचं रक्षण करावं लागतं. पण मंत्र्यांनी या विषयात संतुलन ठेवण्याची गरज आहे.यासोबतच त्यांनी हिंसाचारात सहभागी असलेल्या गुंडांवरही कडक शब्दांत हल्ला चढवला. मुस्लिम समाजातील गुंडांनी लक्षात ठेवावं, वो दिन अब गये... असे ते म्हणाले.

# अमरावती जिल्हातील प्राथमिक शाळांची सकाळ पाळीची वेळ बदला

## जि.प.शाळेतील शिक्षकांचे प्रश्न निकाली काढा : प्राथमिक शिक्षक समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी व प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**



अमरावती जिल्हातील प्राथमिक शाळा दरवर्षी २०मार्च पासुन सकाळ पाळीत भरवल्या जातात.या सकाळ पाळीतील शाळांची वेळ शिक्षणाधिकारी कार्यालयाने पत्रात सकाळी ७.१५ते१२.१५ ही केली त्यामुळे उन्हाची तिव्रता पाहता यात बदल होणे आवश्यक आहे.प्रशासनाने तात्काळ वेळेत बदल करुन ही वेळ सकाळी ७.३०ते११.००करावी या व जि.प.शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यात यावे या मागणीचे निवेदन सोमवार ता.१७ला अमरावती जिल्हा परीषदच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र व प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्या तर्फे उपशिक्षणाधिकारी बुध्दभूषण सोनोने यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली. या निवेदनात मागणी मध्ये२० मार्च २०२५ पासुन सकाळ वेळेत सुरु होणाऱ्या शाळेच्या वेळात बदल करुन ती वेळ सकाळी ७.३० ते ११.०० अशी करण्यात यावी.१ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत आलेले व १ नोव्हेंबर २००५ पुर्वीची जाहीरात निघलेल्या शिक्षकांना १९८२-८४ ची जुनी पेन्शन योजना लागू करुन योजनेचे लाभ देण्याबाबत. व यासंबंधाने आलेले सर्व प्रस्ताव मंजुर करुन तात्काळ पत्र काढण्यात यावे. मार्च २०२४ ला केंद्रप्रमुख यांना देण्यात आलेल्या पदोन्नती संदर्भात ज्या शासन निर्णयानुसार सेवाजेष्ठता यादी तयार करुन पदोन्नती देण्यात आली, त्याच शासन निर्णयाच्या आधारे आता सुध्दा केंद्र प्रमुख पदोन्नतीची प्रक्रिया राबविण्यात यावी.वर्ग १ ते ८ करीता घेण्यात येणारी संकलीत मुल्यमापन परिक्षा २ चे आयोजन एप्रिल २०२५ च्या पहिल्या आठवडयात करण्यात यावे.

शिक्षकांच्या प्रलंबीत वैद्यकीय बीलाकरीता निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. भविष्य निर्वाह निधी च्या मार्च २०२४ पर्यंतच्या स्लीप मिळण्यात यावी. NPS धारक शिक्षकांना PRAN KIT उपलब्ध करुन देण्यात यावे.आंतरजिल्हा बदलीने जिल्हा परिषद अमरावती येथे रुजु झालेल्या शिक्षकांचा हिशोब पुर्ण करण्यात यावे.जि.प.शाळांना निधि उपलब्ध करून देण्यात यावा.जि.प.शाळांचे विज बिल व पाणी बिल ग्रामपंचायत यानी भरण्या बाबतचे पत्र काढण्यात यावा.शाळेच्या मालकीची जमिन असेल त्याचा हर्रास रक्कम शाळा विकासा करीता देण्यात यावी.इत्यादी मागणीचे निवेदन देण्यात आले. निवेदन देतांना प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हा नेते गोकुलदास राऊत,जिल्हा सल्लागार संभाजी रेवाळे,जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार,जिल्हा सरचिटणीस शैलेन्द्र दहातोंडे,राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर, उपस्थित होते.

# स्व.सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे राज्यस्तरीय उत्कृष्ट वाड्.मय निर्मिती पुरस्कार जाहीर

## ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्री रमाकांत कोलते होणार 'साहित्यव्रती' ने सन्मानीत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

मातोश्री स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे ट्रस्ट,अमरावती यांच्यावतीने दिल्या जाणाऱ्या २०२४ च्या उत्कृष्ट वाड्.मय निर्मिती राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली असून यावर्षी सुप्रसिद्ध साहित्यिक,समीक्षक व विचारवंत डॉ.रमाकांत कोलते यवतमाळ यांना 'साहित्यव्रती' पुरस्काराने सन्मानीत करण्यात येणार आहे. विविध साहित्य प्रकारासाठी राज्यातील साहित्यिकांना सन्मानीत करणारी विदर्भातील ही मोठी पुरस्कार योजना आहे.या पुरस्कारांमध्ये उत्कृष्ट कादंबरीसाठीचा पुरस्कार अमरावती येथील श्री विशाल मोहोड यांच्या ' कीड'या कादंबरीला देण्यात आला आहे तर उत्कृष्ट कथासंग्रहाचा पुरस्कार जालना येथील श्री प्रभाकर शेळके यांच्या'डबल ढोलकी' या कथासंग्रहाला मिळाला आहे. श्री तीर्थराज कापगते यांच्या 'मावळत्या गावाचे गाणे'या कवितासंग्रहाला उत्कृष्ट काव्यसंग्रहासाठी पुरस्कार जाहीर झाला असून संमिश्र विभागात वैचारिक वाड्.मयासाठी श्री विनोद राऊत,वर्धा यांच्या 'नामदेव ढसाळ यांची कविता:आस्वाद आणि चिकित्सा या समीक्षा ग्रंथाची तर ललित वाड्.मयासाठी मुंबई येथील विद्या निकम यांच्या 'अस्वस्थ मनाचे पडघम 'या ग्रंथाची निवड झाली आहे. तर बालवाड्.मय प्रकारात गोवा येथील श्री रमेश वंसकर यांच्या 'वार्या वार्या आंबे पाड' या बालकाव्यसंग्रहाची निवड करण्यात आली आहे. तीन हजार रूपये रोख,शॉल,श्रीफळ, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे .

माजी राज्यमंत्री व विद्यमान आमदार श्री. प्रवीणभाऊ पोटे यांनी आपल्या आईच्या स्मरणार्थ स्थापन केलेल्या ट्रस्टच्या वतीने गेल्या दहा वर्षांपासून मराठी साहित्यातील विविध लेखन प्रकारासाठी महाराष्ट्रातील साहित्यिकांना पुरस्कार देऊन सन्मानीत करण्याचा मानस केला आहे.याच योजने अंतर्गत विदर्भातील ज्येष्ठ साहित्यिकांच्या साहित्य सेवेची दखल घेऊन त्यांना 'साहित्यव्रती' पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. रु. पाच हजार रोख, मानपत्र, शाल, श्रीफळ असे 'साहित्यव्रती' पुरस्काराचे स्वरूप असून हा प्रतिष्ठेचा पुरस्कार यंदा यवतमाळ येथील साहित्यिक,विचारवंत श्री रमाकांत कोलते यांना त्यांच्या प्रदीर्घ व निरंतर साहित्यासेवेसाठी देण्याचा निर्णय पुरस्कार समितीने एकमताने घेतला.या पुरस्कार योजनेसाठी प्राप्त झालेल्या ग्रंथांचे मान्यवर परिक्षकांनी परिक्षण केल्यानंतर पुरस्कार समितीच्या सभेत यावर शिक्कामोर्तब करण्यात येऊन पुरस्कारांचे मुख्य आयोजक मा.आमदार श्री प्रवीणभाऊ पोटे,श्री श्रेयस पोटे, समितीच्या संयोजक प्राचार्य डॉ. शोभा रोकडे यांनी पुरस्कारांची घोषणा केली. यावेळी पुरस्कार समितीचे सदस्य प्रा.डॉ.कुमार बोबडे, प्रा. डॉ.पंकज वानखडे, श्री आर.एस.तायडे, श्री संदिप देशमुख,डॉ.मंदा नांदूरकर,ॲड.प्राजक्ता राऊत, उपस्थित होते.सदर पुरस्कारांचे वितरण दि.२५/३/ २४ रोजी सकाळी ११ वा. पी.आर.पोटे पाटील ग्रूप ऑफ एज्यूकेशन इन्स्टीटयूट,मुख्य कार्यालय सभागृह,कठोरा रोड,अमरावती येथे एका शानदार सोहळ्यात करण्यात येईल.तरी सदर पुरस्कार समारंभास उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांच्या तसेच समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

# नागपूर येथे हिंसाचारानंतर अमरावती शहर अलर्ट

## अमरावती पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांची रात्री उशिरापर्यंत शहरात गस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**



औरंगजेबाचया कबरीच्या वादामुळे नागपूरमध्ये हिंसाचार झाला आहे. दोन गटांमध्ये झालेल्या दगडफेकीनंतर परिसरात तणावपूर्ण परिस्थिती आहे. तर दुसरीकडे अमरावती शहरात देखील यापूर्वी हिंसाचाराची पार्श्वभूमी असल्याने अमरावती शहर पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी स्वतः रस्त्यावर उतरत रात्री उशिरापर्यंत शहरात परिस्थितीचा आढावा घेतला.. तर शहरात ठिकाणी पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे.. नागपूर मध्ये जे घडलं ते अमरावती शहरात घडू नये यासाठी व कायदा सुव्यवस्था अबाधित यासाठी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी शहरातील लोकांना शांततेच आवाहन करत कुणीही अफ़वा पसरू नये तर अमरावती शहरात शांतता आहे कुणीही शहरातील शांतता भंग करू नये यासाठी लोकांना पोलिसांनी शांततेचं आवाहन केलं आहे.

# तिवसा येथील एटीएम फोडीप्रकरणी हरियाणातील दोन आरोपींना अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८तिवसा**



तिवसा शहरातील एस.बी.आय. बँकेच्या एटीएम फोडीप्रकरणी हरियाणातील कुख्यात टोळीतील दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण यांच्या पथकाने अटक केली. दि. २६ फेब्रुवारी २०२५ रोजी तिवसा येथील एस.बी.आय. बँकेच्या एटीएम मशीन गॅस कटरच्या साहाय्याने फोडून त्यातील ४ लाख ८० हजार रुपये चोरून नेण्यात आले होते. या प्रकरणी तिवसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याच्या तपासादरम्यान सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे ही चोरी हरियाणातील मोहमदपुर अहीर येथील कुख्यात टोळीने केल्याचे निष्पन्न झाले. १३ मार्च २०२५ रोजी पोलिसांनी मोहमदपुर अहीर, हरियाणा येथे सापळा रचून आमीरखान अख्तर खान (वय ३५) याला अटक केली. चौकशीत त्याने साथीदारांचा सहभाग उघड केला. त्यानुसार १७ मार्च २०२५ रोजी जुबेर अल्लाहदीया (वय ३२, रा. धोज, फरीदाबाद) यालाही अटक करण्यात आली. गुन्ह्यात वापरण्यात आलेली हुंडाई वेरना कार (किंमत अंदाजे ८ लाख रुपये) आणि मोबाईल अंदाजे किंमत १० हजार रुपये जप्त करण्यात आला आहे. अटक आरोपींना २० मार्च २०२५ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून, इतर आरोपींचा शोध सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे व त्यांच्या पथकाने केली.

# ऑटोस्विचमुळे होतोय वीज पुरवठा वारंवार खंडित

## सुरळीत वीज पुरवठ्यासाठी ऑटोस्विच काढून कर्पॅसिटर बसविणे गरजेचे उन्हामुळे विजेची मागणी वाढली;प्रत्येक उपकेंद्राचा भार वाढला

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.१८ अमरावती**



उन्हामुळे विजेची मागणी वाढली आहे.त्यामुळे 'महावितरण'च्या प्रत्येक उपकेंद्राचा विद्युतभार वाढला आहे. शेतीपंपासाठी बसवलेल्या 'ऑटो स्वीच 'मुळे वीज आल्यावर एकाच वेळी सर्व पंप सुरू होऊन विद्युतभार वाढतो. त्याचवेळी रोहित्रावरील (डीपी) दाबही वाढत असल्याने त्यामध्ये बिघाड होऊन वीजपुरवठा बंद पडण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे शेतीपंपांना लावलेले 'ऑटो स्वीच' काढून त्याऐवजी कपॅसिटर बसवणे आवश्यक आहे.

परिमंडळाअंतर्गत अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यात सुमारे २ लाख ७० हजार शेतीपंपधारक शेतकरी आहेत. 'महावितरण'कडून या शेतकऱ्यांना दिवसा व रात्री अशा पद्धतीने वीजपुरवठा करण्यात येतो. हा वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर शेतात जाऊन शेतीपंप सुरू करण्याचा त्रास वाचवण्यासाठी अनेक शेतकऱ्यांनी शेतीपंपांना 'ऑटो स्वीच' लावले आहेत. त्यामुळे वीज येताच शेतीपंप आपोआप सुरू होतात. अनेक शेतीपंप असे एकाच वेळी सुरू झाल्याने रोहित्रावरील (डीपी) भार एकाचवेळीवाढतो. त्यामुळे रोहित्र जळण्याचे किंवा नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढत आहे. ऐन हंगामात रोहित्र जळाल्यास त्याची झळ शेतकऱ्यांनाही सोसावी लागते. त्यामुळे शेतीपंपांना कपॅसिटर बसवून 'ऑटो स्वीच'चा वापर टाळण्याचे आवाहन 'महावितरण'ने केले आहे.डीपी जळल्यामुळे विद्युतपुरवठा खंडित होतोय. यातून होणारी गैरसोय व नुकसान टळावे. तसेच, सुरळीत व योग्य दाबाचा वीजपुरवठा मिळावा, यासाठी शेतकऱ्यांनी शेतीपंपांना कपॅसिटर बसवण्याची गरज आहे. प्रत्येक शेतीपंपास क्षमतेनुसार कपॅसिटर बसविणे, हा रोहित्र जळणे वा नादुरुस्त होण्याचे प्रमाण आटोक्यात आणण्यासाठी सुलभ उपाय आहे. कपॅसिटरमुळे कमी दाबाचा वीजपुरवठा तसेच रोहित्र जळाल्यास वा नादुरुस्त झाल्यास खंडित वीजपुरवठा या समस्या सुटण्यास मदत होणार आहे. ऊर्जा वापरात कपॅसिटर उपकरण महत्त्वाचे आहे. शेतीपंपास कपॅसिटर बसविल्यामुळे विद्युत केबल जळण्याचे प्रमाण कमी होते.कृषीपंपाच्या क्षमतेनुसार कपॅसिटर लावण्यात आले,तर संबंधित भागातील रोहित्रावरील विद्युत भार २१ ते २४ टक्क्याने कमी होते.परिणामी रोहित्र निकामी होण्याचे प्रमाण शुन्य होऊन वीज पुरवठा सुरळीत मिळेल.